रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक ५० | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

रायगड, शुक्रवार, दि. २६ जुलै २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹



● (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# सावधान! 24 तास धोक्याचे


## महाड, पाली, नागोठणे, रोहा, कर्जतला पुराच्या पाण्याचा वेढा

## जनजीवन विस्कळीत, वाहतुकीवर परिणाम

## आज जिल्ह्याला रेड अलर्ट, सतर्कतेच्या सूचना

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**जिल्ह्यात पावसाचा हाहाकार सुरुच आहे. अंबा आणि सावित्री नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. तर, कुंडलिका नदी धोका पातळीजवळून वाहत होती. महाड, पाली, नागोठणे, कर्जतला पुराच्या पाण्याचा वेढा पडला आहे. कर्जतमधील १२७५ हून अधिक नागरिकांचे स्थलांतर करण्यात आले आहे. जनजीवन विस्कळीत झाले आहे. पावसाचा कहर असाच सुरु राहणार असल्याने पुढील २४ तास धोक्याचे असून, जिल्ह्याला २७ जुलै रोजीदेखील रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.** पान २ वर



## जामरुंग पाझर तलावाला गळती

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील सोलनपाडा येथील जामरुंग पाझर तलाव गुरुवारी दुपारी ओव्हरफ्लो झाला. मात्र, तलावाच्या मुख्य बांधामधून सुरू असलेली पाण्याची गळती लक्षात घेता ग्रामस्थांमध्ये भीती वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक ग्रामस्थांनी तलावाची पाहणी केली असून, तलावातून होत असलेली गळती रोखण्यासाठी पाटबंधारे विभागाने कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे. सोलनपाडा येथील जामरुंग येथे असलेल्या पाझर तलावाच्या खाली सोलनपाडा गाव असून, आणखी पुढे जामरुंग गाव आहे. पान २ वर

## तीन नंबरचा बावटा कायम



**चिरनेर :** दहा दिवसांनंतरही धोक्याचा इशारा देण्यात येणारा तीन नंबरचा बावटा कायम असल्याने गेटवे-एलिफंटा, जेएनपीए, मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक अद्यापही बंदच आहे. यामुळे मात्र लॉन्च चालक, शेकडो व्यावसायिकांना रोजीरोटीला मुकावं लागले आहे. १८ जुलैपासून खराब हवामान, वादळी वाऱ्यासह पान २ वर

## घर कोसळले, जीवितहानी नाही



**वेणगाव :** कर्जत तालुक्यातील मोठे वेणगाव येथील अनंता धुंदा गवले यांच्या राहत्या घराच्या दोन बाजूच्या भिंती उन्मळून पडल्याने अर्धे घर कोसळले आहे. बुधवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, परंतु, घरातील कपडे व अन्नधान्य पावसाच्या पाण्यात भिजून मोठे नुकसान झाले आहे.

## राज्यात धुमशान | पुण्यात ३२ वर्षांमधील विक्रमी पाऊस

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पुण्यासह राज्यभरात पावसाने धुमाकूळ घातला असून, अनेक जिल्ह्यांमध्ये हाहाकार माजवला आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पुण्यातील अनेक रस्त्यांना नद्यांचं स्वरुप आलं आहे. अनेकांच्या घरात पाणी शिरलं आहे. तर काही भागात जनजीवनदेखील विस्कळीत झालं आहे. लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी प्रशासन कामाला लागलं आहे. नागरिकांच्या बचावासाठी आणि त्यांना सुरक्षितस्थळी हलवण्यासाठी भारतीय लष्कराची तुकडी तैनात करण्यात आली आहे. गेल्या ३२ वर्षांमध्ये पहिल्यांदाच इतका पाऊस



झाला असल्याची माहिती हवामान तज्ज्ञ अनुपम कश्यपी यांनी दिली आहे.

पुण्याच्या नागरी प्रशासनाने केलेल्या विनंतीवरुन लष्कराच्या बचाव आणि मदत कार्य पथकाने एकता नगरच्या दिशेने प्रयाण केले आहे. या पथकामध्ये पान २ वर

### या जिल्ह्यांना रेड अलर्ट

रायगड, रत्नागिरी, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, सातारा.

### या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

पालघर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, सिंधुदुर्ग.

## बोर्डाचे पुरवणी पेपर पुढे ढकलले

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

राज्यात मुसळधार पावसाने जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. राज्यातील काही ठिकाणी हवामान खात्याने रेड अलर्ट दिल्याने दहावी व बारावीची शुक्रवारी होणारी पुरवणी परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. दहावीचा पुढे ढकलण्यात आलेला पेपर ३१ जुलै रोजी, तर बारावीचा पेपर ९ ऑगस्ट रोजी होणार आहे.

राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पाऊस पडत आहे. आज मुंबई, ठाणे, कोकण आणि आजूबाजूच्या परिसरात जोरदार पाऊस झाला. तर महाराष्ट्रात काही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर उद्या (२६ जुलै) होणाऱ्या दहावी आणि बारावी बोर्डच्या पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. २६ जुलै रोजी होणारा दहावी बोर्डाचा पुरवणी परीक्षेचा पेपर ३१ जुलै रोजी होणार आहे. तर बारावी बोर्ड पुरवणी परीक्षेचा उद्याचा पेपर ९ ऑगस्ट रोजी होणार आहे.२६ जुलै रोजी पान २ वर

## आज शाळा, महाविद्यालयांना सुट्टी

**अलिबाग :** अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांना शुक्रवारी (दि.२६) सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याबाबतचे परिपत्रक जारी केले आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आला आहे.


पाहिजेत

**वामन हरी पेठे ज्वेलर्स अलिबाग शाखेसाठी सेल्स एग्जिक्युटिव पाहिजेत.**

पात्रता :- कोणत्याही शाखेचा पदवीधर.

अनुभव असल्यास प्राधान्य.

प्रत्यक्ष भेटण्यासाठी रविवार दिनांक २८/०७/२०२४

वेळ : सकाळी ११ ते ४.०० वाजेपर्यंत.

संपर्क :- ०२१४१ २२१४७७/ ९९६०५४२६१३







● (छायाचित्र : समीर मालोदे)

## अलिबागच्या समुद्रात जहाज भरकटले

## १४ खलाशी सुखरुप

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

अलिबागच्या कुलाबा किल्ला परिसरात एक मालवाहू जहाज बंद पडले आहे. सदरचे जहाज हे जेएसडब्ल्यू कंपनीचे आहे. धरमतर बंदरातून २५ जुलै रोजी जयगडकडे ते रवाना झाले. मात्र, काही तांत्रिक कारणाने ते भरसमुद्रात बंद पडले. कंपनी अन्य जहाज पाठवून त्यातील तांत्रिक बिघाड दूर करण्याचा प्रयत्न करणार आहे. मरीन ट्रॅफिक सिस्टमध्ये या जहाजाचे लोकेशन हे कुलाबा परिसरात असल्याचे दिसून येते. जहाजावर १४ खलाशी असून, ते सुखरुप आहेत. त्यांची सुटका करण्यात येणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर वाढला आहे. त्यामुळे समुद्रालादेखील उधाण आले आहे. पावसाळ्यात मासेमारी बंद असते. मात्र, मोठाल्या मालवाहू जहाजांचा प्रवास सुरु असतो. कुलाबा किल्ला परिसरात एक भले मोठे जहाज थांबल्याचे दिसत आहे. हे जहाज जेएसडब्ल्यूचे असून, ते धरमत बंदरातून २५ जुलै रोजी जयगड बंदराकडे कच्चा माल घेऊन (कोळसा) निघाले होते. तांत्रिक कारणाने ते जहाज भरसमुद्रात बंद पडले. समुद्रात इतरत्र भरकटू नये यासाठी ते नांगरुन ठेवण्यात आले आहे.

यासंबंधी जिल्हा प्रशासनाने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, हे जहाज जेएसडब्ल्यू कंपनीचे आहे. जहाजात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ते पुढे नेता आले नाही. जहाज भरकटू नये यासाठी ते कुलाबा किल्ला परिसरातील भरसमुद्रात नांगर टाकून थांबले आहे. संबंधित कंपनीचे अन्य एक जहाज तांत्रिक दुरुस्ती करण्यासाठी रवाना करण्यात येणार आहे. तसेच जहाजावरील सर्व १४ खलाशांना आणण्यात येणार आहे, अशी माहिती अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील यांनी 'कृषीवल'शी बोलताना दिली.


**संपूर्ण मनःशांतीसाठी कंपनी-फिट CNG**

**Hyundai कंपनीच्या CNG कार अस्सल वॉरंटी, वर्धित सुरक्षा आणि उत्कृष्ट कार्यप्रदर्शन युक्त**

Grand i10 NIOS लाभ ₹ 48 000* पर्यंत
AURA लाभ ₹ 43 000* पर्यंत
EXTER लाभ ₹ 10 000* पर्यंत




शक्तिशाली आणि पर्यावरणास अनुकूल पॉवरट्रेन | खास ट्यून केलेले सस्पेन्शन | सुपीरियर CNG टाकी क्षमता Grand i10 NIOS: 60 l (पाणी समतुल्य) AURA : 65 l (पाणी समतुल्य) Exter: 60 l (पाणी समतुल्य) | कॉम्पॅक्ट आणि टिकाऊ इंजेक्टरसह शांत केबिन | डबल स्टेज CNG रेग्युलेटर सह सुरळीत ड्रायव्हिंग | RDE अनुरूप आणि E20 इंधन तयार असलेले

HYUNDAI

3 YEAR 100 000km** Warranty Coverage | UPTO 7 YEARS Extended Warranty^ | 3 YEAR Unlimited** Kilometer Warranty | 3 YEARS Road Side Assistance (RSA)# | UPTO 5 YEARS Shield of Trust Running Repair Package | UPTO 5 YEARS Shield of Trust Super Maintenance Package

*For CSD, Government and Corporate Requirements, contact Mr. Joseph Fernandes at jfernandes@hmil.net or 9920209565

Give a missed call on 9555295868 | my Hyundai app | Hyundai Promise Certified Pre-Owned Car | Hyundai Cl!ck to Buy Scan here

*Terms & Conditions apply. Benefits include cash discount, exchange bonus and benefits for government or corporate employees, whichever is applicable. Benefits may vary with variants and are subject to change without prior notice. **3-year warranty or upto 1 00 000 km whichever is earlier for Grand i10 NIOS, AURA, i20 & i20 N line. 3-year unlimited km warranty is applicable for VENUE, VENUE N Line, CRETA, ALCAZAR, TUCSON, VERNA, KONA Electric and IONIQ 5. ^Upto 7 years extended warranty is applicable only for petrol variants. HMIL reserves the right to withdraw/modify the scheme without prior notice. Visit your nearest Hyundai dealership for more details. Hyundai urges you to follow traffic rules – these are meant to keep you safe on roads.

**विशाल ह्युंदाई** पनवेल, Ph: 084228 10904 अलिबाग, Ph: 084228 10907

**शरयू ह्युंदाई** पेण वडखळ, Ph: 091679 50080, 080473 63111

# मनसेचा स्वबळाचा नारा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईतल्या पदाधिकारी मेळाव्यात स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे. गुरुवारी पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात त्यांनी माहिती दिली. युती करायची का? कुणाबरोबर जायचं हे सगळं आपण नंतर ठरवू. मनसेची सत्ता आली पाहिजे यासाठी आपण २२५ ते २५० जागा लढवायच्या आहेत, असं राज ठाकरेंनी जाहीर केलं. लोकसभेला राज ठाकरेंनी मोदींना बिनशर्त पाठिंबा दिला होता. मात्र, आता विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरेंनी वेगळी भूमिका घेतली आहे.

विधानसभा निवडणूक ही अत्यंत चुरशीची आणि घमासान असलेली होणार आहे. या निवडणुकीत मला आपले आमदार निवडून आलेले पाहिजेत म्हणजे पाहिजेतच, असा निर्धार करुन कामाला लागण्याचे आदेश राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना दिले.

ते पुढे म्हणाले की, युती होईल का? कोणत्या जागा मिळतील? असला कुठलाही विचार मनात कुणीही आणू नका. आपण जवळपास २२५ ते २५० जागा लढवणार आहोत. तसंच आज कुणी कितीही मोठ्याने घोषणा दिल्या तरीही तिकीट पक्कं असं समजू नका. कुणी कुठल्याही भ्रमात राहू नका. तसंच मला काही जणांनी सांगितलं की आपला पक्ष काहींना सोडायचा आहे. त्यांना मी रेड कार्पेट घालून देतो, त्यांनी खुशाल पक्ष सोडून जावं. १ ऑगस्टपासून मी महाराष्ट्राचा दौरा सुरु करतो आहे. जिल्हा, तालुक्यात येईन तेव्हा मी तुम्हाला भेटेनेच. मेळावे घ्यायचे की नाही ते नंतर पाहू. मात्र, पदाधिकाऱ्यांच्या बैठका नक्की होतील, असंही राज ठाकरेंनी सांगितलं.

**लाडका भाऊ आणि बहीण योजनेवरुन टीका**

मूळ गोष्टींकडे म्हणजे पाणी, नोकरी, आरोग्य याकडे कुणाला लक्ष द्यायला वेळ नाही. आपल्याकडे काय आहे? लाडकी बहीण आणि लाडका भाऊ. अहो लाडकी बहीण आणि लाडका भाऊ दोन्ही पक्ष एकत्र राहिले असते तर दोन्ही पक्ष टिकले असते. त्यासाठी योजना कशा पाहिजेत? बहिणीला १५०० रुपये देणार, भावाला इतके देणार. राज्य सरकारकडे पैसे आहेत का? रस्त्यावरचे खड्डे बुजवायला पैसे नाहीत. मूळ प्रश्नांकडे लक्ष देणं गरजेचं आहे. हेच महाराष्ट्र विधानसभेसाठी तुमचं कॅम्पेन असलं पाहिजे. एकमेकांना शिव्या द्यायच्या लोकांची दिशाभूल करायची आणि निवडणूक लढवायची यातून काही हाताला लागत नाही, असंही राज ठाकरे म्हणाले.

## पान १ वरून

### सावधान! २४ तास धोक्याचे

रायगडच्या जनतेला दिलासा देण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे हे स्वतः फिल्डवर उतरले आहेत. त्यांनी महाड, पाली, नागोठणे येथील पूरपरिस्थितीची पाहणी केली. दोन दिवस पाऊस बरसत असल्याने सखल भागांमध्ये पाणी साचले आहे. माणगाव ताम्हिणी घाटात तसेच माणगाव येथे तीन ठिकाणी दरड कोसळली होती. प्रशासनाने ती तातडीने दूर केली आहे. रोहा तालुक्यातील कुंडलिका नदी ही सकाळी धोक्याच्या पातळीवरु वाहत होती. त्यामुळे रोहा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. तसेच रोहा-नागोठणे आणि रोहा-वरवटणे पूल वाहतुकीसाठी बंद ठेवला आहे. पाली-वाकण पुलावरुन पाणी वाहत असल्याने येथील वाहतूक बंद करण्यात आली होती. कर्जतमध्येदेखील पावसाचा प्रकोप पहायला मिळत आहे. या ठिकाणीच्या दहीवली पुलावर पाणी आल्याने तोदेखील वाहतुकीसाठी बंद केला होता. शेलू बांधीवली नदीची पाणी पातळी वाढल्याने १२७५ नागरिकांचे स्थलांतर पॅराडाईज इमारतीच्या टेरेसवर केले आहे, तसेच अन्य ३५ जणांना सुरक्षित ठिकाणी हलवले आहे. अलिबाग-बोरघर येथील एक व्यक्ती वाहून गेला असून, त्यांचा मृतदेह सापडला आहे. कमलाकर धर्मा म्हात्रे असे त्याचे नाव आहे.

अलिबाग, पेण, मुरुड, पनवेल, कर्जत, खालापूर, पाली, रोहा, तळा, माणगाव, महाड, पोलादपूर, म्हसळा आणि श्रीवर्धन तालुक्यात अशंतः पूर्णतः पक्क्या आणि कच्च्या घरांचे नुकसान झाले आहे. त्यामध्ये एकूण ५४ घरांचा समावेश आहे. तसेच चार चारचाकी वाहनांसह नऊ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही सुरु केली आहे.

### जामरुंग पाझर तलावाला गळती

या पाझर तलावाची निर्मिती झाल्यानंतर आतापर्यंत तब्बल दोनवेळा पाझर तलाव सुरक्षित ठेवण्यासाठी किमान १० कोटी खर्च करण्यात आले आहेत. आज मागील काही दिवस सुरू असलेल्या संततधार पावसामुळे सोलनपाडा येथील जामरुंग पाझर तलाव ओव्हरफ्लो झाला.त्यानंतर ग्रामस्थांनी तलावाच्या भिंतीची पाहणी केली असता धरणाच्या बांधामधून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती सुरू आहे.मात्र यावर्षी धरणांमधून होणारी पाण्याची गळती रोखण्यासाठी मोठया प्रमाणावर निधी खर्च करण्यात आला आहे.तरीदेखील पाण्याची गळती सुरू असल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.या पाणी गळती मध्ये धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी खाली वाहून जात धरणाच्या खाली लोकवस्ती असलेल्या दोन्ही गावातील रहिवाशी यांच्या मनात भीती वाढली आहे. धरण फुटले आणि रात्रीची वेळ असेल तर अनर्थ होईल या भीतीने स्थानिकांनी धरणाची पाहणी केल्यानंतर पाण्याची गळती रोखण्यासाठी पाटबंधारे विभागाने कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे. ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच आणि स्थानिक रहिवासी संदेश सावंत यांनी आपल्या गावातील अन्य ग्रामस्थ यांच्यासह तलावाची पाहणी केली आणि त्यानंतर ही मागणी केली आहे. पाझर तलावाची निर्मिती झाल्यानंतर मागील दहा वर्षांत दहा कोटींचा निधी धरणाच्या दुरुस्तीसाठी आणि पाणीगळती रोखण्यासाठी खर्च झाले आहेत आणि तरीदेखील पाण्याची गळती सुरू असल्याने ग्रामस्थांनी भीती व्यक्त केली आहे.

### तीन नंबरचा बावटा कायम

पावसाचा फटका आणि लावण्यात आलेल्या धोक्याचा इशारा देण्यात येणारा तीन नंबरचा बावट्यामुळे येथील जेएनपीए, मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस या सागरी प्रवासी वाहतुकीलाही मोठ्या प्रमाणावर बसला आहे. गेटवे ऑफ इंडिया येथून पावसाळी हंगामात दररोज ७-८ तर संडे हॉलिडेला २०-२५ लॉन्चेस सुमारे १००० ते १५०० पर्यटकांना घेऊन एलिफंटा लेण्या पाहण्यासाठी जातात. तर, ३० मिनिटांच्या समुद्रसफरीचा आनंद लुटण्यासाठी गेटवे ऑफ इंडिया येथूनच हार्बरसाठी दररोज २५०० ते ३००० पर्यटक येतात.

मात्र, सर्वच बंदरात धोक्याचा इशारा देणारा तीन नंबरचा बावटा लावण्यात आल्याने गेटवे ऑफ इंडिया येथून दररोज होणारी पर्यटन वाहतूक गुरुवारपासूनच पुरती ठप्प झाली आहे. बंदरात आदळणाऱ्या व उसळणाऱ्या उंचच उंच लाटा, फेसाळलेला समुद्र यामुळे खबरदारीची उपाययोजना म्हणून गेटवे ऑफ इंडिया ते एलिफंटादरम्यान सागरी वाहतूक केव्हाही अनियमित कालावधीसाठी बंद करण्यात येत असते. त्यामुळे बेटावर पावसाळ्यातही जाणाऱ्या हजारो देशी-विदेशी पर्यटकांवर माघारी परतण्याची वेळ येते. त्यामुळे एलिफंटा बेटावरही एकाही पर्यटकाला लेण्या पाहण्यासाठी जाता येत नाही. यामुळे मात्र लॉन्च मालकांना दररोज लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्याची माहिती गेटवे-एलिफंटा जलवाहतूक संस्थेचे अध्यक्ष इक्बाल मुकादम यांनी दिली. तीन नंबरचा धोक्याचा इशारा देणारा बावटा जोपर्यंत खाली उतरत नाही, तोपर्यंत स्थिती राहील, अशी प्रतिक्रिया गेटवे-मुंबई बंदर निरीक्षक गुंजन यांनी दिली.

### पाण्याचा पुरात अडकली कार

नवीन पनवेल : तालुक्यातील नांदगाव येथील पुलावर कार अडकल्याची घटना घडली. मुसळधार पाऊस झाल्यानंतर दरवर्षी या पुलावरून पाणी जाते. या पुलावरून एक कार जात असताना अचानक पाण्याचा प्रवाह वाढला आणि कार पाण्याच्या प्रवाहात अडकली. सुदैवाने यातील चालक बाहेर निघाल्याने कोणताही अनर्थ घडला नाही. त्यानंतर हायड्राच्या मदतीने सदरची कार बाहेर काढण्यात आली.

### तरुणाला वाचवले

**नेरळ :** तालुक्यातील टाकवे येथील आदिवासी तरुण गणेश पवार हा कामासाठी घराबाहेर निघाला आणि महापुराच्या पाण्यात वाहून गेला. पोहता येत असल्याने उल्हास नदीला पूर आलेला असतानादेखील जिद्दीने नदीतून वाट काढत झाडाची मदत घेतली आणि तेथे तग धरून थांबून राहिला. त्यानंतर अपघातग्रस्त मदतीसाठी या रेस्क्यू टीमने वाहत्या पाण्यात उतरून त्या तरुणाला सुखरूप बाहेर काढले. या टीमच्या सदस्यांनी गुरुनाथ साठलेकर यांच्या नेतृत्वाखाली किमान ३०० मीटर आत जाऊन त्या तरुणाला बाहेर सुरखरुप काढले. नदीबाहेर आल्यावर गणेश पवारने खोपोली येथून आलेल्या टीमने मला वाचविण्यासाठी पाण्यात उड्या घेतल्या हे कधीही विसरू शकत नाही, अशी प्रतिक्रिया दिली. तसेच प्रशासनाचेही आभार मानले.

### राज्यात धुमशान

लष्कराचे जवान, अभियांत्रिकी कृती दल तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश असून या पथकासोबत आपत्तीने प्रभावित लोकांना मदत करण्यासाठी तसेच तत्पर आणि परिणामकारक मदतकार्यासाठी आवश्यक बचाव बोटी आणि अत्यावश्यक वैद्यकीय सेवा देण्यासाठी टीम सज्ज करण्यात आली असल्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

लष्कराच्या अतिरिक्त पथकांना सज्ज ठेवण्यात आले असून वेळ आलीच तर अगदी कमी वेळात ही पथके आवश्यकता असेल तेथे त्वरित पोहोचू शकतील. भारतीय लष्कराच्या दक्षिण कमांडमधील अधिकारी नागरी प्रशासन तसेच इतर सरकारी संस्थांशी समन्वय साधत, परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. स्थानिक प्रशासनाकडून लष्कराच्या मदतीसाठी विनंती करण्यात आली. या विनंतीला प्रतिसाद देत लष्कराच्या कृती दलाला प्रभावित भागाकडे तातडीने पाठवण्यात आले. एकूण ८५ जणांचा समावेश असलेल्या या पथकामध्ये लष्कराचे जवान, अभियांत्रिकी रेजिमेंट आणि लष्करी रुग्णालये तसेच इतर तज्ज्ञ घटकांतील वैद्यकीय पथके सहभागी आहेत.

**भारतीय सशस्त्र दले तयारीत**

लष्कराचे जवान बचाव आणि मदतकार्यात संपूर्णपणे सहभागी झाले आहेत. गरज लागली तर मदतीसाठी भारतीय हवाई दलालादेखील सज्ज राहण्यास सांगितले आहे. या आपत्तीत नागरी प्रशासनाला मदत करण्यासाठी भारतीय सशस्त्र दले तयारीत आणि सुसज्ज आहेत.

**चौघांचा दुर्दैवी मृत्यू**

पुण्यात विजेचा धक्का लागल्याने तीन जणांचा मृत्यू झाला आहे. पुण्यातील भिडे पुलाजवळील घटना घडली आहे. अंडा भुर्जीचा स्टॉल सुरक्षित ठिकाणी नेत असताना दुर्दैवी घटना घडली. तर, ताम्हिणी घाटात एका छोट्या भोजनालयावर दरड कोसळल्याने एकाचा मृत्यू झाला, तर दुसरा जखमी झाला आहे. लवासा परिसरातील एका बंगल्यात तीन जण चिखलात अडकल्याची भीती पोलिसांनी व्यक्त केली आहे.

**कोणते पूल बंद?**

पुणे महानगरपालिका हद्दीत बालेवाडी पूल, मुळा नदी पूल, संगम रोड पूल, होळकर पूल, संगमवाडी पूल, महर्षी शिंदे पूल, हडपसर-मुंढवा रोड पूल, मातंग पूल, येरवडा शांतीनगर येथील पूल, निंबजनगर पूल, मोई व चिकली रस्त्यावरील इंद्रायणी पूल पावसामुळे पाण्याखाली गेले आहेत.

**एनडीआरएफची ११ पथके तैनात**

राज्यात आतापर्यंत एनडीआरएफची ११ पथकं तैनात करण्यात आली आहेत. तर, ७ पथकं राखीव ठेवण्यात आली आहेत. त्यापैकी मुंबई व रत्नागिरीत प्रत्येकी दोन पथकं आहेत. ठाणे, पालघर, रायगड, कोल्हापूर, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत प्रत्येकी १ पथक आहे. ही पथकं ३१ ऑगस्टपर्यंत तैनात राहणार आहेत. तर, ७ पथके राखीव असून, ती सध्या मुंबई, पुणे व नागपूरमध्ये तळ ठोकून आहेत. तर, एसडीआरएफची ६ पथकं वेगवेगळ्या ठिकाणी तैनात करण्यात आली आहेत.

### बोर्डाचे पुरवणी पेपर पुढे ढकलले

दहावी बोर्डाच्या पुरवणी परीक्षेचा विज्ञान व तंत्रज्ञान भाग २ चा पेपर सकाळी ११ ते दुपारी १ दरम्यान नियोजित होता. मात्र, आता हा पेपर ३१ जुलै रोजी सकाळी ११ ते दुपारी २ दरम्यान होईल. तर बारावी बोर्डाच्या पुरवणी परीक्षेचा वाणिज्य आणि संघटन व्यवस्थापन, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान, एमसीव्हीसी पेपर-२ हे तीन पेपर होते. हे बारावी बोर्ड पुरवणी परीक्षेचे तीन पेपर आता ९ ऑगस्ट रोजी होणार आहे.

---

**पनवेल महानगरपालिका**
**जाहिर सुचना**

उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग), स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत पनवेल महानगरपालिका हद्दीत ॲस्पिरेशनल सार्वजनिक शौचालय बांधणेबाबत आवश्यक AUTOMATION KIT करिता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर कामाचा तांत्रिक तपशील व इतर बाबी www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. २५/०७/२०२४ ते दि. ०१/०८/२०२४ पर्यंत दुपारी ०३.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदर कामाची बाजारभाव दरपत्रके दि. २५/०७/२०२४ ते दि. ०१/०८/२०२४ पर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत घनकचरा व्यवस्थापन विभागात स्वीकारण्यात येतील.

जा.क्र पमपा/घकवि/२५२४/प्र.क्र.१६७/६०२/२०२४
दि. २५/०७/२०२४

सही /-
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

---

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
**पिनकोड- ४०२ २०१**

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दूरध्वनी/फॅक्स क्रमांक :- (०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई-निविदा सूचना क्र. ११ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अनामत रक्कम | ई-निविदा शूल्क (वस्तू व सेवा करसह) | कालावधी मर्यादा | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०० बेडचे सामान्य रूग्णालय, अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड चे ३०० बेडमध्ये श्रेणीवर्धन करून सदर रूग्णालय इमारत बांधकाम करणे या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन व वास्तुविशारद सल्लागार नेमणूक करणे. | रू.१,५०,०००/- | रू. ३५४०/- (ना परतावा) | ९० महिने (दोष दायित्व कालावधी धरून) | पात्र एजन्सी |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक २६/०७/२०२४ (स. १०.००) ते दिनांक ०२/०८/२०२४ (सं. १८.००)
ई-निविदा उघडणे :- दिनांक ०६/०८/२०२४ (दु. ३.०० वा.)
(कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांचे कार्यालयात)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/३८४७/२०२४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, अलिबाग- ४०२ २०१
दिनांक :- २२/०७/२०२४

सही/-
**(ज.ई. सुखदेवे)**
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, अलिबाग,
जि. रायगड

---

**जाहीर नोटीस**
**मुरुड येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयांत**

क्रि.चौ.अर्ज. १२९/२०२४

आसिफा मोहम्मद अली चोगले, (लग्नापुर्वीचे नांव)
आसिफा साबीर शाहबंदर (लग्नानंतरचे नांव) ...अर्जदार
विरुध्द
मा. ग्रामसेवक सो.,
ग्रुप ग्रामपंचायत विहूर, ... सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांचा जन्म दि. १५/०५/१९७४ रोजी गांव- विहूर, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झालेला असुन त्यांची ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत विहूर, ता. मुरुड, जि. रायगड यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड तहसिल न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६९ चे कलम १७ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा जन्म दि. १५/०६/१९७४ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. १३/०८/२०२४ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांना त्यांची स्वतः ची जन्म नोंद ही जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ९/०७/२००४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**रोहन शिंदे**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

---

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

---

**Corrigendum-1**

Ref: E-Tender Notice No.01 for 2024-2025_AD/Tender/3643/2024

| Tender Published | Read |
|---|---|
| Period of Online Downloading/ Sale of Bid Document Documents Date 15.07.2024 to 26.07.2024, 6.00 PM | Download / Sale End Date: 15.07.2024 to 22.07.2024, 6.00 PM |
| Submission of bid fee Receipt, Bid security and other documents (Hard Copy) etc. Date: 15.07.2024 to 22.07.2024, 6.00 PM | Date: 15.07.2024 to 26.07.2024, 6.00 PM |
| Opening of Technical & Price bid Date: 25.07.2024, 3.00 PM | Date : 29.07.2024, 3.00 PM |

AD/AB/TC/3834/2024
Executive Engineer
P. W.Division, Alibag
Date: 22.07.2024

Sd/-
**Executive Engineer**
**P. W.Division,Alibag**

---

**ग्रामपंचायत पहेल, ता.माणगाव, जि.रायगड**

ग्रामपंचायत पहेल १५ वित्त आयोग सन २०२२/२३ व २०२३/२४ निधी अंतर्गत खालील प्रमाणे कामांसाठी दिनांक ०१/०८/२०२४ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सिलबंद दरपत्रक मागविण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र | कामांचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १) | रा.जि.प शाळा पहेल शाळेला लादी बसविणे | ७५००० | ७५० | २०० |
| २) | पहेल गाव गटार दुरूस्ती करणे | ७५७५० | ७५० | २०० |
| ३) | पहेल गाव अंतर्गत गटार बांधणे | ९६००० | ९६० | २०० |
| ४) | रामदास पंगोजी मांजरे ते मंगेश शांताराम खराडे यांच्या घरापर्यंत गटार बांधणे | १००००० | १००० | २०० |

अटी आणि शर्ती
१.दरपत्रक प्रक्रियेच्या नियम व अटी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२.अंतिम तारखेस दि.०१/०८/२०२४ रोजी सकाळी ११.वा नंतर आलेली दरपत्रके घेतली जाणार नाही.
३.प्राप्त दरपत्रके दि.०२/०८/२०२४ रोजी दुपारी १ वा ग्रामपंचायत पहेल कार्यालयात उपस्थितासक्षम सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील. नामंजूर दरपत्रकाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. व बिलाची रक्कम ग्रापंचायतीकडील तरतुदीनुसार अदा करण्यात येईल.
४.साहित्य उत्तम दर्जाचे (आयेसाय/आयएसओ मार्क प्रमाणित) असावे. पुरवठादार जीएसटी नोंदणीकृत असावा.
५.कोणत्याही एक अथवा अनेक दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीचा राहील.

सही/-
**ग्रामसेवक**
**सौ.श्रेया सतीश ढेपे**
**ग्रामपंचायत पहेल**

सही/-
**सरपंच**
**करिश्मा प्रसाद मांजरे**
**ग्रामपंचायत पहेल**

---

**ग्रुप ग्रामपंचायत भाले ता. माणगाव जि. रायगड**
**जाहीर निविदा सन २०२४/२५**

**नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि.२२/०७/२०२४**

सर्व खालील साहित्य व सेवा पुरवठादार यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत भाले. ता. माणगाव, जि. रायगड यांना सन २०२४/२५ या आर्थिक वर्षाच्या कालावधीमध्ये खालील दर्शविल्या प्रमाणे साहित्य सेवा आवश्यकतेनुसार कमी अधिक प्रमाणात लागणार आहेत. तरी इच्छुक पुरवठादार यांनी खालील साहित्याचे कामाचे तपशिलासह व सर्व करासहित असलेले आपले दरपत्रक निविदा ग्रामपंचायतीला ३०/०७/२०२४ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत सादर करावेत. निविदा उघडणेचा दि. ३१/०७/२०२४ राहील.

| अ. क्र. | साहित्यांचे/कामांचे नाव | निविदा फॉर्म फी (रु.) | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| १) | ग्रा.पं. लेख संहिता २०११ अंतर्गत अभिलेखे, विविध नमुने,पावती पुस्तके, रजिस्टर इ. पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| २) | ग्रामपंचायत कार्यालयीन कामाकरिता स्टेशनरी साहित्य पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ३) | पाणी शुद्धीकरणासाठी टी.सी.एल. पावडर पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ४) | पाणी पुरवठा विभागाकरिता आवश्यक साहित्य पुरवठा करणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ५) | पाणी पुरवठा योजना साधनांची दुरुस्ती करणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ६) | कार्यालयीन संगणकीय दुरुस्ती व आवश्यक साहित्य पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ७) | विद्युत विभागाकरिता विद्युत साहित्य पुरवठा करणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ८) | शासकीय योजना, इ. प्रचार प्रसिध्दी फ्लेक्स बॅनर्स फ्रेम्स पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ९) | शेवाळी प्रतिबंधात्मक पावडर पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| १०) | सार्वजनिक स्वच्छते करिता कार्बोलिक पावडर पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ११) | ग्रामपंचायत कार्यालयासाठी आवश्यक फर्निचर पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| १२) | ग्रामपंचायत कर्मचारी यांना गणवेश, रेनकोट, छत्री इ. पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| १३) | सहाय्यभूत उपकरणे (घमेल, कुदळ, फावडे,ग्लोज, झाडू, मास्क, टिकाव, पाने, बॅटरी, बॅग) इ. पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| १४) | वृक्ष लागवड व संवर्धनासाठी रोपे व अनुषांगिक साहित्य पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| १६) | धूरफवारणी, निर्जंतुक औषध फवारणीकरिता औषधे, इंधन पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |

**अटी व शर्ती :-**
१) सही नसलेली व अटी शर्तीची कोटेशन स्विकारली जाणार नाहीत.
२) कोटेशन नोटीस व करारनामा हा कोटेशनचा एक भाग असेल.
३) निधीच्या उपलब्धते नुसार कामाची देयके अदा करण्यात येतील.
४) कामासाठी लागणारे साहित्य स्पेसिफिकेशन प्रमाणे व नमूद केलेल्या मान्यता प्राप्त कंपन्यांचे वापरणे/पुरविणे पुरवठादारास बंधनकारक राहिले.

वरील कामकाजाबाबतची सर्व माहिती ग्रामपंचायत मध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मिळू शकेल कोणतेही कोटेशन कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा नाकारणे तसेच प्राप्त झालेल्या सर्वच कोटेशन नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता.माणगांव जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता.माणगांव जि.रायगड**

---

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email :- mahad.ee@mahapwd.com ph. No. (०२१४५) २२२१६७
**निविदा सूचना क्रमांक १३ सन २०२४-२०२५**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड मु.पो.ता. महाड, जिल्हा रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना दिनांक २५/०७/२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक ०१/०८/२०२४ रोजी १८.०० वाजेपर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरून ऑनलाईन खरेदी करण्यात येतील व दिनांक ०२/०८/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पद्धतीने या कार्यालयात सादर कराव्यात व कार्यकारी सा.बां. विभाग, महाड हे भरून पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक ०२/०८/२०२४ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | देहेन पाष्टी पांगळोली प्राजिमा ७६ कि.मी. ४/०० ते ५/०० ८/५०० ते ११/६०० मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल दुरूस्ती करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड | ९८९२३६ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | नैवरूळ कोकबल सांगवड तोसडी बंडवाडी रस्ता प्राजिमा ७५ कि.मी. ३/०० ते ८/०० मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल दुरूस्ती करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड | ९९६२०९ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | चिखलप दांडगुरी रस्ता प्राजिमा ५७ कि.मी. ०/०० ते १०/८०० मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड | ९३३३३३ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | वडवली दिवेआगर प्राजिमा ७४०/०० ते ५/५०० मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड | ७४०९२० | ८००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | डालघर होटगाव घरोशी रस्ता प्राजिमा ६२ कि.मी. ०/०० ते १०/२०० मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका माणगाव, जिल्हा रायगड | ९६९६५९ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | भोरावा सवाद धारवली कालवली किये तळीये माझेरी रस्ता प्रा.जि.मा. ६५ कि.मी. ०/०० ते ६/०० मध्ये एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका पोलादपूर जिल्हा रायगड | ९९२०९१ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | साखरफाटा ते साखर तळ्याची वाडी गोवेले रस्ता प्राजिमा १०० कि.मी. ०/०० ते १०/०० मध्ये एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका पोलादपूर जिल्हा रायगड | ७७०४२४ | ८००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | पोलादपूर सडवली आंबवडे रस्ता प्राजिमा ९६ कि.मी. ०/०० ते ६/०० मध्ये एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड | ७६१२०७ | ८००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | भाले जावटे रस्ता कि.मी. ४९/००० ते ५२/२०० मध्ये एक वर्षासाठी देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका माणगाव, जिल्हा रायगड | ५८६६३२ | ६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | श्रीवर्धन वाळवटी रस्ता प्राजिमा ५६ कि.मी. ०/०० ते ०/६०० मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड | ४६८३०१ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| ११ | दिघी म्हसळा माणगाव रा.मा. ९८ कि.मी. २३/९०० ते २६/०० ते मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड | ३४७७७४ | ४००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| १२ | श्रीवर्धन लोणेरे रस्ता रा.मा. ९९ कि.मी. १७/००० ते १८/००० मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड | ४२२७०७ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |

टिप : १) तपशीलवार निविदा सूचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३३५४
दिनांक :- २४/०७/२०२४

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/२६**

# रायगडात 'दम'धार

रायगड जिल्ह्याला मुसळधार पावसाने झोडपले आहे. गेल्या चोवीस तासात झालेल्या पावसाच्या दमधारेने जिल्ह्यातील प्रमुख नद्यांपैकी सावित्री,अंबा, कुंडलिका या नद्यांनी धोका पातळी ओलांडली होती तर पाताळगंगा नदीने इशारा पातळी ओलांडली होती. उल्हास आणि गाढी या नद्यांना देखील पूर आला होता. रायगड जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट जाहीर केला आहे. बुधवारची रात्र आणि गुरुवारचा दिवस पावसाचा होता. रोहा, महाड, पनवेल, कर्जत, रसायनी या शहरांमध्ये नद्यांचे पाणी घुसले होते. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. सुरक्षिततेचा उपाय म्हणून जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले होते.



• ( छायाचित्र : प्रसाद पाटील, महाड)





• ( छायाचित्र :धम्मशील सावंत)

• पाली



• महाड



• महाड



• मुसळधार पावसाने कोलाड परिसर जलमय झाला होता.



• रोहा तालुक्यातील गोवे गावात पाणी शिरून घरांचे मोठे नुकसान झाले.



• ( छायाचित्र : समीर मालोदे )

• अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर खवळलेल्या समुद्राच्या लाटांनी किनाऱ्याला झोडपले.



• ( छायाचित्र : सुधीर नाझरे )


• मुरूड शहरामधील बाजारपेठेमध्ये मुसळधार पावसाने शुकशुकाट पाहायला मिळाला.

## पनवेलला पावसाचा तडाखा













• काल रात्रीपासून पडत असलेल्या मुसळधार पावसाने पनवेल तालुक्याला झोपडले. काळुंद्र नदीचा प्रवाह मुसळधार पावसाने वाढला. नांदगाव गावाचा संपर्क तुटला. पनवेलच्या एसटी आगारामध्ये पाणी साचल्याने प्रवाशांची तारांबळ उडाली होती. गाढी नदीला पूर आल्याने झोपड्यामध्ये पाणी शिरले. पनवेलच्या कोळी वाड्याला पाणी लागले. गुरूवारच्या पावसाळी वातावरणामुळे पनवेलकरांच्या जुन्या आठवणी ताज्या झालेल्या पहायला मिळाले. ( छाया: राजेश डांगळे )

# आता तरी शहाणे व्हा

मराठ्यांना राखीव जागा मिळाव्यात म्हणून मनोज जरांगेंनी गेल्या ऑगस्टमध्ये पहिले उपोषण केले. त्याला आता एक वर्ष होईल. तेव्हापासून त्यांची पाच उपोषणे झाली. पहिल्या दोन उपोषणांच्या वेळी ते सरकारला एक दिवसाचीही जादा मुदत द्यायला तयार नव्हते. नंतर ऐन २६ जानेवारीच्या अगोदर त्यांनी मुंबईत येण्याची घोषणा केली. त्याचे मोठे नाटक झाले. प्रत्यक्षात सरकारने त्यांना नवी मुंबईतूनच परत पाठवले. त्यावेळी आंदोलनाचा मोठा विजय झाला म्हणून राज्यभर सत्कार समारंभ झाले. नंतर पुन्हा जरांगेना फसवणूक झाली असे वाटले. मधल्या काळात आरक्षणाबाबतचा न्यायालयातला खटला चालू आहेच. सरकारने निवडणुकीच्या आधी मराठ्यांना खूष करण्यासाठी दहा टक्के वेगळे आरक्षण देण्याचे जाहीर केले. आता त्यालाही आव्हान दिले गेले आहे. गेल्या वर्षी उपोषणाला सुरू केली तेव्हा कुणबी अशा नोंदी असलेल्या कुटुंबांना मराठा आरक्षणाचे फायदे मिळावेत इतकीच त्यांची मागणी होती. ती मुख्यतः मराठवाड्यापुरती होती. निजामाच्या अमलामध्ये सात बारा इत्यादींवर अशा नोंदी केल्या गेल्या होत्या. मात्र नंतर शेती करणारे ब्राह्मण, मारवाडी, दलित इत्यादींच्या सातबाऱ्यांरही कुणबी अशा नोंदी सापडू लागल्या. आंदोलनाची पंचाईत झाली. त्यातच कुणबी नोंदीवाल्यांच्या आधारे त्यांच्या सोयऱ्याधायऱ्यांनाही आरक्षण मिळावे असे जरांगे यांचे म्हणणे होते. पण ते कायद्यात बसवणे अशक्य होते. त्यामुळे आंदोलनाची दिशा बदलत गेली. आता, मराठ्यांना ओबीसी कोट्यातून राखीव जागांचा लाभ मिळावा ही जरांगे यांची मुख्य मागणी आहे. एकूण जरांगे यांच्या प्रामाणिकपणामुळे गेल्या वर्षी हे आंदोलन जबर उंचीवर गेले व त्याला प्रतिसाद मिळाला. किंबहुना, मराठा आरक्षणाचा मुद्दा मृतप्राय झालेला असताना त्यांनी त्यात जान फुंकली. पण आता जरांगे यांच्याच हेकेखोरपणामुळे, बेताल बोलण्यामुळे आणि सतत उद्दिष्ट बदलल्यामुळे हे आंदोलन पार भरकटले आहे.

### शिंदे-फडणवीसांची लबाडी

एकीकडे मराठा समाज सत्ताधीश असताना त्याच समाजातील हजारो कुटुंबे कमालीची गरीब आहेत ही वस्तुस्थिती आहे. या गरीब वर्गाला विशेष मदत दिली गेली पाहिजे हेही खरे आहे. मात्र जातनिहाय राखीव जागांमध्ये त्यांचा समावेश करावा काय हा वादग्रस्त प्रश्न आहे. एक जात म्हणून मराठे हे मागास नाहीत. महार, मांग वा इतर दलित जातींना समाजाने अस्पृश्य म्हणून वागवले तशी वागणूक मराठ्यांना कधीही मिळाली नव्हती. वर्ग म्हणून, भारतातल्या इतर कोणाही जातींप्रमाणेच, त्यांच्यातही गरीब लोक आहेत. तरीही राजकीयदृष्ट्या मराठा समाजाची मते सर्वच पक्षांसाठी निर्णायक असल्याने मराठ्यांनाही राखीव जागा द्यायला हव्यात यावर राज्यात एकमत आहे. मात्र आरक्षणाची पन्नास टक्क्यांची कमाल मर्यादा आधीच गाठली गेलेली आहे. ती ओलांडून मराठ्यांसाठी वेगळी तरतूद करायची झाल्यास केंद्राला दुरुस्ती करून ही मर्यादा वाढवावी लागेल. पण मोदी तर त्यावर बोलायलाही तयार नाहीत. त्यामुळे ओबीसी कोट्यातून राखीव जागा मिळवण्याचा जरांगेंचा प्रयत्न आहे. त्याला अर्थातच ओबीसींचा विरोध आहे. कारण, त्यांच्या कोट्यामध्ये मोठ्या प्रमाणात नवे वाटेकरी निर्माण होण्याचा धोका आहे. या स्थितीत खरे तर मराठ्यांना असे आरक्षण मिळणे कठीण आहे हे सरकार तसेच सर्वच राजकीय पक्षांनी स्पष्टपणे मराठा समाजाला सांगायला हवे होते. पण एकनाथ शिंदे यांनी असा हिशेब केला की, जरांगेंच्या मागण्यांवर निर्णय घेतल्याचे नाटक करु आणि मराठ्यांचे हिरो होऊ. तर आपल्याला सोडून ओबीसी कुठे जाणार असे भाजपला वाटत होते. या दोन जातींच्या मदतीने आपण विरोधकांची गोची करून टाकू असे मांडे शिंदे आणि फडणवीस खात होते. पण जरांगेंच्या मागण्यांनी असे काही वळण घेतले आहे की, आता ते शिंदे सरकारला नकोसे झाले आहेत. एकेकाळी जरांगे यांना आपापल्या गावात बोलावून, त्यांचा सत्कार करणाऱ्यांमध्ये श्रीकांत शिंदे, भरत गोगावले इत्यादी नेते आघाडीवर होते. आता हेच लोक जरांगे यांना शिव्या देत आहेत.

### आंदोलन ते राजकारण

या प्रश्नाचा राजकीय फायदा उठवण्याचा शिंदे-फडणवीसांनी पुरेपूर प्रयत्न केला. पण तो फसला. उलट आता प्रकरण अंगाशी येऊ लागले. हे पाहून आता त्यांनी विरोधकांना जाब विचारायला सुरुवात केली आहे. ओबीसीमधून आरक्षण देण्याबाबत विरोधकांनी भूमिका स्पष्ट करावी असे ते म्हणत आहेत. ओबीसी कोट्याला धक्का न लावता, पन्नास टक्क्यांची मर्यादा न ओलांडता मराठ्यांना आरक्षण कसे दिले जाणार आहे हे सरकारने आजवर उघड केलेले नाही. यासाठी मोदी सरकारला साधी विनंती करण्याची हिंमत देखील यांच्यात नाही. मात्र विरोधकांवर कुरघोडी करण्याचे हास्यास्पद प्रयत्न चालूच आहेत. त्यातच जरांगे यांनी आता राज्य विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी चालवली आहे. आंदोलनातर्फे सुमारे चाळीस जण निवडून आणावेत आणि बऱ्याच जणांना पाडावे असा त्यांचा उद्देश आहे. त्यांचे आमदार किती होतील हे सांगणे अशक्य आहे. मात्र इतरांचे उमेदवार पाडण्यात ते नक्की यशस्वी होतील. मराठवाडा आणि लगतचा विदर्भाचा तसेच सोलापूर तसेच नाशिक जिल्ह्यांचा काही भाग यात त्यांचा प्रभाव नक्कीच दिसू शकेल. लोकसभेला याची चुणूक पाहायला मिळाली आहे. त्यावेळी एकूण समाजातच मराठा विरुध्द ओबीसी अशी फूट पडली होती. ती आणखी वाढेल असे सध्याचे चित्र आहे. गेल्या दोन वर्षात राज्याच्या राजकारणाचा भाजपने विचका केला आहे. पक्ष फोडाफोडीने कळस गाठला आहे. त्यात आता या फुटीची भर पडेल. यातून कदाचित या किंवा त्या गटाला फायदा होईल. जरांगेंचेही काही जण निवडून येतील. उद्या सरकारला कदाचित त्यांचा पाठिंबाही घ्यावा लागेल. तरीही, आंदोलनाने उभे केलेले प्रश्न सुटणार नाहीत. कारण आरक्षणाच्या प्रश्नाची किल्ली केंद्राच्या हातात आहे. त्यासाठी घटनादुरुस्ती करून मर्यादा वाढवावी लागेल. जातनिहाय जनगणना करावी लागेल. शिवाय इतके करूनही सरकारी नोकऱ्या कमीच होत जाणार आहेत. आंदोलनाला वर्ष पूर्ण होत असताना जरांगे व समर्थकांनी याचा विचार करावा.

---

**विचार**

# जलसंकटावर मात करण्याचा राजमार्ग

**मिलिंद बेंडाळे**

***भारताला येत्या काही वर्षांमध्ये मोठ्या जलसंकटाचा सामना करावा लागू शकतो. 'नीती' आयोगाच्या अहवालानुसार २०५० पर्यंत भारतातील ५० टक्क्यांहून अधिक जिल्ह्यांमध्ये पाण्याची कमतरता भासू शकते. आज जलशुद्धीकरणासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रदूषित पाण्याचा पुनर्वापर करता येतो. पाणीपुरवठा समतोल करून पाणीटंचाई असलेल्या भागांना प्राधान्याने पाणी देता येईल. हे सारे कसे साध्य करता येईल?***

भारतातील दरडोई पाण्याची मागणी २०५० पर्यंत ३० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे तर जलस्रोतांच्या कमतरतेमुळे दरडोई पाण्याची उपलब्धता १५ टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे. असे झाल्यास पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होईलच; शिवाय वस्त्रोद्योग, वीजनिर्मिती आणि शेतीसारख्या पाण्याची गरज असलेल्या उद्योगांनाही धोका निर्माण होईल. भारतातील जलसंकटाचा थेट परिणाम पाणीकेंद्रित उद्योगांवर होणार आहे. यामध्ये वस्त्रोद्योग, वीजनिर्मिती आणि शेतीचा समावेश आहे. कपड्यांच्या निर्मितीमध्ये, फायबर प्रक्रिया, धुणे, रंगवणे आणि फिनिशिंगमध्ये पाण्याचा वापर केला जातो. अशा परिस्थितीत भारतात जलसंकटासारखी समस्या वाढल्यास या प्रक्रियेला खीळ बसू शकते. पाण्याच्या कमतरतेमुळे उद्योगांना पर्यायी आणि महाग पाणी व्यवस्थापन तंत्र वापरावे लागू शकते. त्यामुळे उत्पादन खर्च वाढेल आणि गुणवत्तेवरही परिणाम होईल. आपल्या देशातील जलविद्युतनिर्मिती प्रणाली मुख्यत्वे जलाशय आणि नद्यांवर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत पाण्याच्या कमतरतेमुळे वीज उत्पादनात घट होऊ शकते किंवा सरकारला पर्याय शोधावा लागेल. औष्णिक वीज केंद्र थंड होण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. पाण्याच्या कमतरतेमुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो आणि वीज उत्पादन कमी होऊ शकते. भारतातील बहुतेक शेतकरी जमिनीचे सिंचन करण्यासाठी जलाशय, नद्या आणि भूजलातील पाण्याचा वापर करतात. अशा परिस्थितीत पाण्याअभावी पिकांच्या सिंचनावर परिणाम होतो. त्यामुळे उत्पादनात घट होण्याची शक्यता असते.

पाण्याअभावी पीक उत्पादनात घट होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होते. त्याचा नकारात्मक परिणाम होतो आणि अन्नसुरक्षेला धोका निर्माण होतो. देशातील पाण्याच्या कमतरतेमुळे तलाव, नद्या आणि हिल स्टेशन्सवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. म्हणजेच पाणीटंचाई आणि संबंधित समस्यांमुळे पर्यटकांची संख्या कमी होऊ शकते. त्यामुळे पर्यटन उद्योगाचे नुकसान होऊ शकते. पाण्याच्या टंचाईमुळे शेती आणि पाणीकेंद्रित उद्योगांमध्ये रोजगाराच्या संधी कमी होऊ शकतात. त्यामुळे बेरोजगारी वाढू शकते. याशिवाय जलसंकटग्रस्त भागातील लोकांची आर्थिक स्थिती कमकुवत होऊ शकते. परिणामी, आर्थिक असुरक्षितता वाढते. 'नीती' आयोगाच्या अहवालात म्हटले आहे की भारताने पाण्याच्या कमतरतेच्या समस्येवर काही ठोस पावले न उचलल्यास २०५० पर्यंत या देशाला त्याच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) सहा टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते.

भारतातील जलसंकटाची अनेक प्रमुख कारणे असली तरी सर्वात महत्त्वाचे म्हणजे वेगाने वाढणारे शहरीकरण आणि औद्योगीकीकरण. या देशातील लोकसंख्या सातत्याने वाढत असल्याने पाण्याची मागणीही वाढत आहे. दुसरीकडे, शहरीकरणामुळे जलस्रोतांवर दबाव वाढत असून जलसंकट निर्माण होत आहे. हवामानातील बदलामुळे आणि पावसाच्या बदलत्या पद्धतींमुळे काही भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण होत आहे तर काही भागात दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण होत आहे. याशिवाय हिमालयातील हिमनद्या वितळल्याने जलस्रोतांची अनियमितता होते. त्यामुळे नदी प्रणालींवर परिणाम होतो. भारतात भूजलाचे शेती, उद्योग आणि घरगुती वापरासाठी अतिशोषण होत असून भूजलपातळीत झपाट्याने घट होत आहे. यामुळे भविष्यात जलसंकट निर्माण होऊ शकते. याशिवाय देशातील नद्या आणि तलावांमधून पाण्याचा अतिरेकी उपसा होत असल्याने हे जलस्रोत कोरडे पडत आहेत. आपल्या देशात पाण्याचा अतिवापर केला जातो; पण त्याच्या संवर्धनासाठी कोणतीही ठोस योजना नाही. याशिवाय पाणीपुरवठा आणि वितरण व्यवस्थेतील अनियमितता आणि गळतीमुळेही पाण्याचा अपव्यय होतो. भारतातील शहरीकरणामुळे होणारी जंगलतोड जलस्रोतांच्या गुणवत्तेवर आणि प्रमाणावर नकारात्मक परिणाम करते. उद्योगधंदे आणि घरगुती कचऱ्यामुळे भारतातील जवळपास सर्व नद्या, तलाव आणि भूजल स्रोत प्रदूषित होत आहेत. त्यामुळे स्वच्छ पाण्याची उपलब्धता कमी होत आहे. याशिवाय शेतीमध्ये वापरली जाणारी रासायनिक खते आणि कीटकनाशकेही जलस्रोत प्रदूषित करतात.

आज भारतातील नद्या धोक्यात आहेत. केंद्रीय जल आयोगाच्या (सीडबल्यूसी) अहवालानुसार जून २०१९ च्या अखेरीस, भारतातील गोदावरी, कृष्णा आणि कावेरी या तीन प्रमुख नद्यांची खोरी धोक्यात आली होती. २०१९ पर्यंत कावेरीमध्ये २२ टक्के पाण्याची क्षमता होती. आता ती १२.५ टक्क्यांवर आली आहे. गोदावरी आणि कृष्णा नदी खोऱ्यातील पाणीसाठा ८.७ टक्के आणि ५.७ टक्के होता. भारतातील नद्यांना हवामान संकट, अनावश्यक धरणे बांधणे, बांध घालणे आणि जलविद्युतकडे ओढा, वाळू उत्खनन यासारख्या स्थानिक कारणांमुळे गंभीर धोका आहे. धरणे आणि विकास प्रकल्पांमुळे सर्वाधिक लांबीच्या नद्या झपाट्याने कोरड्या पडत आहेत. आज भारतातील ९६ टक्के नद्यांची लांबी अवघी दहा किलोमीटर आहे. काही शंभर किलोमीटर त्रिज्येच्या आत आहेत. लांब नद्या पाचशे ते एक हजार किलोमीटरच्या श्रेणीत आहेत. पाण्याचे संकट कमी करण्यासाठी भारताला लांब आणि बारमाही नद्यांची गरज आहे. पर्यावरण तज्ज्ञांच्या मते देशातील वाढत्या जलसंकटाचे सर्वात मोठे कारण म्हणजे तलावांची नासाडी. हवामानबदल, प्रदूषण, मानववंशजन्य क्रियाकलाप, गर्दीचे क्षेत्र आणि लोकांच्या सदोष वर्तनामुळे भारतातील तलावांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. भूजल कमी होणे हेदेखील एक प्रमुख कारण आहे आणि अतिशोषणामुळे परिस्थितीवर नकारात्मक परिणाम झाला आहे.

'नीती' आयोगाच्या जून २०१८ मधील संयुक्त जल व्यवस्थापन निर्देशांकाच्या अहवालानुसार २००१ मध्ये भारतात दरडोई पाण्याची उपलब्धता १,८२० घनमीटर होती. ती २०११ पर्यंत कमी होऊन १,५४५ घनमीटर झाली. याच अहवालात २०२५ पर्यंत ही उपलब्धता १,३४० घनमीटर आणि २०३० पर्यंत १,१४० घनमीटरपर्यंत कमी होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. २०५० पर्यंत देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये पाणीटंचाई निर्माण होईल. 'नीती' आयोगाचा २०१९ चा अहवाल सांगतो की सुमारे ७४ टक्के गहू लागवड क्षेत्र आणि ६५ टक्के भात लागवड क्षेत्रात २०३० पर्यंत तीव्र पाणीटंचाई जाणवेल. पाण्याच्या समस्यांवर मात करण्यासाठी देशाच्या बजेटमध्ये २०२४ पर्यंत सर्व ग्रामीण घरांना पाईपद्वारे पाणीपुरवठा करण्याची योजना असली तरी भारतातील पाण्याच्या जास्त वापरामुळे पाण्याचे नियोजन कठीण होते. देशातील वार्षिक पावसापैकी सुमारे ८० टक्के पाऊस जून ते सप्टेंबरदरम्यान होतो. या महिन्यांमध्ये सुमारे २५ दिवस सर्वात जास्त पाऊस पडतो. याचा अर्थ असा की देशातील जवळपास एक-सप्तमांश भाग जादा पावसाच्या काळात पुराचा सामना करतो. २०५० पर्यंत भारताला पाणीटंचाईचा सामना करावा लागेल, असे भाकीत केले जात आहे.

आज देशातील अनेक राज्ये पाणीटंचाईने त्रस्त आहेत. या राज्यांमध्ये राजधानी दिल्लीचाही समावेश आहे. अशा परिस्थितीत केंद्र सरकारबरोबरच आपण सर्वांनी आपल्या स्तरावर जलसंधारणाबाबत ठोस पावले उचलली पाहिजेत. पावसाचे पाणी साठवण्यासाठी घरे, इमारती आणि सार्वजनिक ठिकाणी 'रेनवॉटर हार्वेस्टिंग' यंत्रणा बसवली पाहिजे. त्याची व्यापक चळवळ हाती घेऊन असे पाणी साठवून त्याचा उपयोग करणाऱ्यांना प्रोत्साहन द्यायला हवे.

याशिवाय शेतीसाठी ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या तंत्रांचा वापर करून पाण्याचा अपव्यय कमी करता येतो. जल व्यवस्थापनाचा सर्वसमावेशक आराखडा बनवून भूपृष्ठ आणि भूजल स्रोतांचे कार्यक्षम व्यवस्थापन करता येईल. पाणलोट क्षेत्र विकसित करून जलसाठा आणि भूजल पुनर्भरणाला चालना दिली जाऊ शकते. याशिवाय, स्मार्ट मीटरिंग आणि इतर डिजिटल तंत्रज्ञानाच्या मदतीने पाण्याचे निरीक्षण सुधारले जाऊ शकते. जलशुद्धीकरणासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रदूषित पाण्याचा पुनर्वापर करता येतो. देशातील पाण्याचे वाढते संकट पाहता जलसंधारण आणि व्यवस्थापनासाठी कठोर कायदे करून त्यांची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करता येईल. पाणीपुरवठा समतोल करून पाणीटंचाई असलेल्या भागांना प्राधान्याने देता येईल. याशिवाय केंद्र आणि राज्य सरकार जलसंधारणाचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी जनजागृती मोहीम राबवू शकतात. जल व्यवस्थापनात स्थानिक समुदायांना सहभागी करून समुदाय स्तरावर जलसंधारणाचे प्रयत्न केले जाऊ शकतात.

---

**आजकाल**

# सर्वधर्मसहभावाचे पाईक फादर फ्रान्सिस दिब्रिटो

**सदानंद मोरे**

उस्मानाबाद येथे भरत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची माला अत्यंत सन्मानाने फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांच्या गळ्यात पडली, तेव्हा माझ्यासारख्या त्यांच्या अनेक मित्रांना मनापासून समाधान वाटले. स्वतः माझ्यापुरते सांगायचे झाल्यास गेल्या वर्षाच्या सुरुवातीला 'राजहंस प्रकाशना'ने दिब्रिटोंचे 'नाही मी एकला' हे आत्मचरित्र प्रसिद्ध केले त्याचे प्रकाशन माझ्या हस्ते व्हावे अशी दिब्रिटो यांची इच्छा होती. त्यानुसार श्री. दिलीप माजगावकर, डॉ. सदानंद बोरसे आणि मी वसईला गेलो व पुस्तकाचे प्रकाशन केले. दिब्रिटो हे ख्रिस्ती आहेत, ख्रिस्ती धर्मगुरू आहेत; त्यामुळे त्यांना ख्रिस्ती धर्माचा अभिमान असणे स्वाभाविकच आहे. तथापि आपण जन्मताना भारतीय नागरिक म्हणून जन्माला आलो आणि त्यानंतर दोन आठवड्यांनी ख्रिस्ती धर्माची दीक्षा मिळाली म्हणून 'मी प्रथम भारतीय आहे व त्यानंतर ख्रिस्ती आहे ह्याचे भान मी नेहमीच ठेवले आहे,' असे ते सांगतात.

दिब्रिटोंच्या अभिमानाचा आणखी एक विषय म्हणजे मराठी भाषा. वसई परिसरातील सामवेदी ब्राह्मण असलेल्या काही हिंदुंनी स्वेच्छापूर्वक ख्रिश्चन धर्माचा त्याग काही शतकांपूर्वी केला तरी त्यांनी मराठी भाषा आणि मराठी संस्कृती यांचा त्याग केला नाही. उलट त्यांच्यावर प्रेम करीत त्यांना समृद्ध केले. त्यांचा वारसा चालवणाऱ्या मंडळींमध्ये दिब्रिटोंचा समावेश होतो. मुळात धार्मिक वृत्तीच्या माणसाला भाषिक संवेदनशीलता असली म्हणजे तो आपोआपच संतसाहित्याकडे वळतो हे वेगळे सांगायची गरज नाही. त्यासाठी आपल्याकडे रेव्ह. ना. वा. टिळकांचे ठसठशीत उदाहरण आहे. अशा प्रकारची अनेक माणसे वसईनी दिली आहेत. बिशप थॉमस डाबरे, फादर मच्याडो, कवी सायमन मार्टिन इ. बिशप डाबरे यांनी बायबलमधील साक्षात्काराच्या संदर्भातील अन्नप्रतीकांच्या व तुकोबांच्या अभंगांतील तशाच प्रतीकांचा तौलनिक अभ्यास करून डॉक्टरेट मिळवली आहे. ही मंडळी व्हॅटिकनला जातात तेव्हा तेथील धर्माभ्यासकांना महाराष्ट्रातील संतांची महती सांगतात, हे मला ठाऊक आहे. डाबरे वसई प्रांताचे धर्मगुरू असताना त्यांनी मला व दिलीप चित्रे यांना तेथे निमंत्रित करून आमची तुकोबांवर व्याख्यानेही घडविली होती. दरम्यान दिब्रिटो 'सुवार्ता' मासिकाचे संपादक असताना मी 'सुवार्ता'साठी काही लेखनही केले होते.

'नाही मी एकला' हे शीर्षक दिब्रिटोंनी रेव्ह. टिळकांच्या कवितेतून घेतले असले तरी त्यातून मिळणाऱ्या दिलाशाची पार्श्वभूमी अविरत संघर्षाचीही आहे हे लक्षात घ्यायला हवे. त्या दृष्टीने पाहिले तर मला दिब्रिटोंचे आयुष्य ही एक अंतर्बाह्य संघर्षाची व त्या संघर्षांवर धार्मिक वृत्तीमुळे मात करणाऱ्या साधकाची वाटते. धर्मगुरूपद स्वीकारल्यानंतर धर्मगुरूने करावयाच्या कर्तव्यांमधील एक महत्त्वाचे कर्तव्य म्हणजे चर्चमध्ये 'कन्फशन'(कोमसार)साठी येणाऱ्यांचे कन्फेशन ऐकून घेणे. दिब्रिटो फादर झाल्यावर थोड्याच दिवसांत एकदा खुद्द त्यांच्या मातोश्री चर्चमध्ये 'कन्फेशन'साठी आल्या होत्या. या प्रसंगी झालेला आंतरिक संघर्ष वाचताना मी नखशिखान्त शहारलो. फादरांमधील धर्मगुरूच्या कर्तव्यबुद्धीने नात्यावर मात केली एवढे सांगितले तरी पुरे! येशू, रेव्ह. टिळक अशा अनेक खास ख्रिस्ती विषयांवर लेखन करणाऱ्या वि. द. घाटे यांनी येशूच्या जीवनातील बंडखोरीचा आवर्जून उल्लेख केला आहे. घाटे लिहित होते तेव्हा लॅटिन अमेरिकन राष्ट्रांत लिबरेशन थिऑलॉजीचा उदय झाला नव्हता. पण दिब्रिटोंच्या काळात तो झाला होता. धर्मगुरूने दीक्षा, उपदेश, प्रवचन या वर्तुळाबाहेर जात रस्त्यावर उतरून अन्याय, अत्याचार, शोषण याविरुद्ध लढा दिला पाहिजे असे या विचारप्रणालीचे म्हणणे आहे. दिब्रिटोंनी तसेच केले. त्यातूनच 'वसई वाचवा' ही पर्यावरणाची चळवळ उभी राहिली. याही संघर्षातून ते तावून सुलाखून बाहेर निघाले.

बायबलचे सुबोध मराठी भाषांतर किंवा भावानुवाद ही दिब्रिटोंनी मराठी भाषेला दिलेली देणगीच आहे. बायबलच्या अनुवादाचे प्रयोग गेली दीड-दोन शतके चालू आहेत. रेव्ह. टिळक आणि पंडिता रमाबाई यांच्या या अनुवादाच्या चौकटीविषयी झालेला वाद जाणकारांना ठाऊक आहे. अशा वादांपासून स्वत:ला अलिप्त ठेवून दिब्रिटोंनी ही कामगिरी बजावली हे विशेष. त्यांच्या साहित्य क्षेत्रातील कामगिरीची दखल घेत त्यांना साहित्य अकादमी, महाराष्ट्र शासन यांनी यथोचित गौरविले आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांना 'ज्ञानोबा-तुकाराम' पुरस्कार देऊन त्यांच्या मराठी संतांशी असलेल्या नात्यावर जणू राजमान्यतेची मोहोर उमटवली असे म्हणता येते. अर्थात त्यांच्या या प्रयोगांवर आक्षेप घेणारी काही मंडळी ख्रिस्ती वर्तुळातूनच पुढे आली हा भाग वेगळा. तो अंतर्गत संघर्षाचा समजू या. त्यांच्यासारख्या समबुद्धीच्या माणसांना स्वधर्मातील व परधर्मातील कर्मठांकडून होणारा विरोध सहन करावा लागतो हे त्यांचे प्राक्तनच म्हणायला हवे. दिब्रिटोंच्या मते 'धर्म हे संघर्षाचे आणि स्पर्धेचे नव्हे, तर संवादाचे आणि सहकार्याचे क्षेत्र आहे. आपण परधर्माचे स्वरूप आत्मीयतेने समजून घेतले, तर अधिक डोळसपणे स्वधर्माचे पालन करू शकतो.' ही दिब्रिटोंची भूमिका राहिली आहे. हे समजून घेण्यासाठी त्यांनी अनेक प्रयोग केले. एकदा पालखीमार्गावर वारकऱ्यांच्या दिंडीतही सामील झाले. तो अनुभव कथन करताना ते लिहितात, 'वारकऱ्यांना बाह्य जगाचे भान उरत नाही, ते भक्तिरसात आकंठ डुबून जातात. नृत्यरंगी बेभान होतात. किती अंतर कापले, किती अंतर उरले याचा हिशेब ते ठेवीत नाहीत. गती हीच त्यांची स्थिती. गाव-गाव ते मार्गक्रमण करतात शेवटी वाळवंटी तीरी ते खेळ मांडतात. वारी हे मला जीवनाचे प्रतीक वाटते.' दिब्रिटो आणखी एका ठिकाणी लिहितात, 'भागवत संतांचे साहित्य हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा आहे. मराठी माणसाच्या मनात प्रवेश करण्याची संतसाहित्य ही खात्रीची पाऊलवाट आहे. एक ख्रिस्ती म्हणून बायबल समजून घेण्यासाठी व समजावून देण्यासाठी मला संतसाहित्याची मदत झाली आहे. रेव्ह. नारायण वामन टिळक हे तुकानामक सेतुवरूनि ख्रिस्तचरणी आले. मला प्रथम ख्रिस्ताची ओळख झाली आणि त्यानंतर संतसाहित्याचा परिचय झाला. प्रभू येशूंनी मला संतांच्या मांदियाळीपर्यंत आणले आहे. संतांनी माझे जीवन समृद्ध केले आहे. त्यांची वचने माझ्या लेखनात सहज येतात.' भारत हे एक 'सेक्युलर' राष्ट्र आहे. 'सेक्युलॅरिझम'चा अर्थ काही उत्साही पुरोगामी सर्व धर्मांना सारख्याच अंतरावर दूर ठेवणे असा घेतात. तर प्रतिगामी धर्माला जवळ करून इतर धर्मांना दूर लोटण्याच्या प्रयत्नांत असतात. कबीर, एकनाथ, प्रभाकरपंत भांडारकर, रेव्ह. टिळक ही परंपरा मात्र सर्वधर्मसहभाव मानणारी परंपरा आहे. त्यात इतर धर्मांतील ग्राह्यांश घेणे व प्रसंगी स्वधर्मावरील (आत्म) टीकाही अंतर्भूत आहे. मला वाटते फादर दिब्रिटो हे याच परंपरेचे पाईक आहेत. **(साभार)**

---

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२६ जुलै**

**१८७०:-** ज्योतिर्गणितज्ञ गोविंद सदाशिव आपटे यांचा जन्म. त्यांच्या 'पंचांग-चिंतामणी' या सूक्ष्म सारणी ग्रंथामुळे, पुढील अनेक वर्षाचे पंचांग तयार करता येते. 'सर्वानंद लाघव' हाही त्यांचाच गणित ग्रंथ. तसेच 'वल्गना विवेचन' अथवा 'चहा काव्य' नावाचे पुस्तक त्यांनी लिहिले. त्यांची या विषया वरील ज्ञानाची दखल उज्जैन येथील ज्योतिष संमेलनाकडून 'गणकचूडामणि' ही पदवी देऊन करण्यात आली. 'धि इतिशिअलस् पॉईंट ऑफ अवर झोडियाक्' हा इंग्रजी ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१८९४:-** अभिनयाला वाव देणारी 'शिशुगीते' हा प्रकार मराठीत रुळवणारे वासुदेव गोविंद मायदेव यांचा जन्म. जुन्या अंकलिप्यांतील अनेक कविता त्यांच्या असत. 'किलबिल', 'छंदगीत','क्रीडागीत' हे शिशुगीत संग्रह, 'भावनिर्झर', 'भावतरंग','भावविहार' हे भावकवितांचे संग्रह, विधवांच्या दु:खाला वाचा फोडणारे 'गरिबांची गोष्ट' हे खंडकाव्य, 'सॉक्रेटिस' हे नाटक व 'हिंदुधर्म परिचय' हा निबंध अशी त्यांची ग्रंथसंपदा होय. **१९२२:-** कोल्हापूर संस्थानचे अधिपती, समाजसुधारक, विचारवंत राजर्षी शाहू महाराज यांचे निधन. यांनी प्रत्यक्ष साहित्य निर्मिती केली नसली तरी साहित्य निर्मिती केली नसली तरी साहित्य निर्मितीस प्रोत्साहन दिले. त्यांची भाषणे म. ब. जाधव यांनी संपादित करुन पुस्तक रुपात प्रसिध्द केले. **१९३४:-** लेखक आणि हैद्राबाद 'पंचधारा' या हैद्राबाद मराठी साहित्य परिषदेच्या नियतकालिकाचे संपादन केलेले प्रा. दत्तात्रय पंढरीनाथ जोशी यांचा जन्म. **१९३४:-** लेखक सी. डी. देशमुख यांचा जन्म. लोकसंख्या विस्फोटावर बेतलेली 'नियोग' ही त्यांची कादंबरी प्रसिध्द झाली आहे. **१९४१:** आकाशवाणीचे मान्यताप्राप्त गीतलेखक तसेच कविता, विडंबने, प्रासंगिक लेख, स्फूट लेखक शरद पिदडी यांचा जन्म. 'अलबेली','अंतरातल्या','डोळे' ह्या काव्यसंग्रहासह 'चिऊ काऊची कथा नवी' ही प्रयोगक्षम बालनाटय संगीतिका तसेच 'शरदसंधान मुक्तके', 'गुरुस्तवनांजली' आदी ग्रंथ संपदा त्यांच्या वावावर आहे. **१९४४:-** वाड्:मय इतिहासकार प्रभाकर वासुदेव बापट यांचे निधन. 'प्राचीन मराठी आख्यानक कविता' व 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास' ही त्यांची अभ्यासपूर्ण पुस्तके. ह्या पुस्तकातून 'आख्यानकविता आणि कादंबरी' या साहित्य प्रकाराची ओळख करुन देणाऱ्या बापटांचा प्रयत्न होता. याशिवाय 'आपले जग', 'लो.टिळकांची धर्मविषयक मते' ही पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. वयाच्या अवघ्या ४२ व्या वर्षी निधन झाले. **१९४८:** लेखिका सुमन गोलाघवे यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत 'आमचीही भाग्यरेषा','कुमाऊच्या कुशीत','भरारी युरोप खंडाची' ही प्रवासवर्णने, 'भारतीय नगरे','इंद्रप्रस्थ उर्फ नवी दिल्ली' ह्या ऐतिहासिक पुस्तकांसह 'माझे अभिनव प्रयोग' अशी ग्रंथ संपदा. **१९६१ :** कवी रमणलाल पारधी यांचा जन्म. 'स्वप्नवेल' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला आहे. **१९६७ :** चरित्र लेखक शेषराव मडावी यांचा जन्म. ह्यांचा 'चांदागडचे गोंडराजे','वीर बाबुराव शेळके' यांच्या चरित्र ग्रंथासह 'समाज घटकाची कथा' हा माहितीपर आणि 'आदिवासी महामानवाचे' चरित्र अशी ग्रंथ संपदा. **१९८६:** तत्त्वचिंतक, कादंबरीकार पुरुषोत्तम यशवंत देशपांडे यांचे निधन. विधि महाविद्यायात प्राध्यापक असणाऱ्या पु.यं.नी पाच कादंबऱ्या लिहिल्या. मात्र 'सोविएत रशिया आणि हिंदुस्थान' तसेच 'गांधीजीच का?' या वैचारिक लिखाणामुळे ते प्रकाशात आले. 'नवी मूल्ये' या निबंधसंग्रहातून त्यांची संस्कृतीविषयक नवी जाणीव स्पष्ट होते. याशिवाय 'अनामिकाची चिंतनिका' हा तात्त्विक ग्रंथ आणि तीन खांडांचे 'अनुभवामृत-रसरहस्य' ही त्याच्या विद्वतेची साक्ष देणारी पुस्तके होत. **१९८७ :** लेखक, नेत्रतज्ञ, वक्ते डॉ. दत्तात्रय गोपाळ पटवर्धन यांचा जन्म. 'डोळयांची काळजी' या विषयाच्या एका ग्रंथासह 'भारत यात्रादर्शन' हे पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **२०१०:** लेखक नानासाहेब मानाजी तिडके यांचे निधन. मनाला विलक्षण उंचीवर नेणारा व सध्याच्या काव्य विश्वाचे रुप पालटणारा व मधुर भक्तिची प्रचिती आणणारा वेदांत साहित्य सार्थ असा 'विश्वात्मकें देवे' या ग्रंथासह 'उाररााग', 'अभिसारिका रसवंती','काव्यजयंती','भैरवी' आदी पुस्तके प्रकाशित तसेच मराठवाडयात प्रातिनिर्धिक कविता संग्रहाची सुरुवात त्यांनीच केली.
**२०११ :** लेखक, प्रकाशक, कुशल ग्रंथविक्रेते आणि स्वातंत्र्योत्तर पिढीतील एक बुध्दिनिष्ठ सामाजिक विचारवंत अशी बहुआयामी ओळख असलेले सदानंद भटकळ यांचे निधन. भारतीय लेखकांनी लिहिलेल्या वैद्यकीय ग्रंथाबरोबरच समाज शास्त्रावरील अनेक उत्कृष्ट ग्रंथांचे प्रकाशनही त्यांनी केले. 'फेडरेशन ऑफ बुकसेलर्स ॲण्ड पब्लिशर्स ऑफ इंडिया' या संस्थेचे ते संस्थापक आणि नंतर अध्यक्षही होते. फ्रँकफर्ट बुक फेअरमध्ये भारतीय साहित्याचे दर्शन घडवणाऱ्या प्रातिनिधिक पुस्तकांचे दालन मांडण्याची कल्पनाही त्यांनीच प्रथम प्रत्यक्षात आणली. अलीकडेच त्यांनी संक्षिप्त मराठी वाड्:मय कोशाच्या तीन खंडांचे संपादन आणि प्रकाशन केले होते.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२६ जुलै

१) श्री. बाळाराम वामन पाटील
२६-७-१९४१, ढवर, कुरूळ

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# नेरळ-कळंब रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य



**। नेरळ । वार्ताहर ।**

कायम वर्दळ असलेला नेरळ-कळंब या राज्यमार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. तर, निर्माण नगरीजवळ मोरीवर मोठा खड्डा पडला आहे. हा खड्डा अपघाताला निमंत्रण देत असून याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

नेरळ-कळंब मार्गावर वाहनांची कायम वर्दळ असते. तर, या मार्गावरील नेरळ ते साईमंदिर हा रस्ता नागरी भागात असल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांची सुध्दा वर्दळ असते. निर्माण नगरी पासून पाडा गेट हा डांबरी रस्ता असल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. खड्डे चुकवण्याच्या नादात वाहनचालकांचे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर, याच मार्गावर पुढे निर्माण नगरीजवळ मोरीला मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने यावर तात्काळ कार्यवाही करावी. हे खड्डे बुजवून मोरीची देखील दुरुस्ती करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

> **या मार्गावरचे सर्व खड्डे बुंजविण्याच्या सूचना देऊन तसेच मोरीबाबत पाहणी करून तिच्या दुरुस्तीची तत्काळ कार्यवाही करण्यता येईल.**
> **– संजीव वानखेडे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग कर्जत**

> **माझं मातोश्रीनगर येथेच दुकान आहे. समोरच मोठे खड्डे पडले असून खड्डे चुकवण्याचा नादात अनेकदा पादचाऱ्यांना वाहनांचे धक्के लागण्याच्या घटना घडत असतात. तर, याच खड्ड्यांमुळे वाहनचालक चुकीच्या दिशेने वाहन चालवत असल्याने येथे मोठा अपघात घडू शकतो. तेव्हा येथील खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने बुजवावे आणि हा रस्ता सिमेंट काँक्रीटचा करावा, अशी आमची मागणी आहे.**
> **– नितीन म्हसे, ग्रामस्थ**

## वन्यजीवांचे संरक्षण, सुटका मार्गदर्शन

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

पडसरे येथील आश्रमशाळेत मंगळवारी (दि.२३) वन्यजीव प्राण्यांचे संरक्षण आणि त्यांची सुटका याविषयी मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते.

अलीकडे वन्यजीव प्राण्यांची संख्या खूपच कमी होत चालली आह. यातच पशु-पक्षी, प्राण्यांचे जखमी होण्याचे प्रमाण खूप वाढले आहेत. या विषयी मार्गदर्शन करण्यासाठी पुण्यातील रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट येथून श्रीनाथ चव्हाण, इजाज शेख आले होते. त्यांनी उत्तम असे मार्गदर्शन केले. प्राण्यांचे अपघात किंवा त्यांना दुखापत झाले की काय प्रथमोपचार करावे, कोणती काळजी घ्यावी, कोण कोणते साप विषारी असतात असे अनेक प्रकारे सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी ज्ञानप्रबोधिनी पुणे येथून आलेले ओंकार बानाईत, प्राणीमित्र शंतनू लिमये, संदिप शिंदे, मीनाक्षी ढोपे, शिक्षक वर्ग, अधीक्षक आणि कर्मचारी वर्ग तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते. या संपुर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश महाडीक यांनी केले.




## श्रीनिवासराव देशमुख यांचे निधन



**। जालना । वार्ताहर ।**

श्रीनिवासराव कृष्णराव देशमुख (सेवलीकर) जालना यांचे रविवारी (दि.२१) अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८५ वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर पुणे येथील काळेवाडी स्मशानभूमीत सोमवारी (दि.२२) अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, दोन सुना, जावाई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# सुतारवाडी पर्यटन स्थळांकडे पर्यटकांची पाठ

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

जुलै महिना संपत आला तरी सातत्याने मुसळधार पडणाऱ्या पावसामुळे नागरिकांचे जीवन विस्कळीत झाले आहे. जून, जुलै महिन्यात पाऊस चांगला झाल्यानंतर निसर्ग हिरवी शाल पांघरायला सुरुवात करतो. अशा ठिकाणी सुट्टीच्या दिवशी पर्यटक आपल्या कुटुंबासह येत असतात. परंतु, काही ठिकाणी मृत्युचे प्रमाण वाढत असल्याकारणाने त्या पर्यटन स्थळावर जाण्यास बंदी घालण्यात आलेली आहे. यामुळे सुट्टीच्या दिवशी पर्यटन स्थळांकडे पर्यटकांनी पाट फिरवलेली आहे.

यावर्षी पाऊस चांगला झाल्याने निसर्गाने सर्वत्र हिरवी शाल पांघरली आहे. अशा ठिकाणी सुट्टीच्या दिवशी पर्यटक आपल्या कुटुंबासह येत असतात. ताम्हाणी घाटातील निसर्गाचे सौंदर्य तर विलोभनीय असते. त्या ठिकाणी डोंगरावरून जमिनीवर कोसळणारे फेसाळ पाणी धबधब्यावर वाहताना त्याखाली अंघोळ करण्याचा मोह अनेकांना होतो. मात्र, पर्यटकांचा थिल्लरपणा आणि जीव घेणे प्रसंग, तसेच शासनाने दिलेले नियम मोडल्यामुळे अनेक वेळा बाका प्रसंग ओढावतो व मृत्युच्या प्रमाणात वाढ होते. त्यामुळे येथील पर्यटन स्थळावर बंदी घालण्यात आली. मुशी, देवकुंड सोबतच सुतारवाडी येथील धरणाच्या बाजूचा परिसर अत्यंत विलोभनीय आहे. या ठिकाणी ही धरणातील पाणीसाठा आणि सभोवतालचे निसर्ग पाहण्यासाठी विविध शहरांतील पर्यटक हजेरी लावत असतात. मात्र, सतत कोसळणाऱ्या पावसामुळे तसेच धबधब्यावर जाण्यास बंदी घालण्यात येत असल्याने व रस्त्यावर जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे पर्यटकांनी पाठ फिरवली आहे. यामुळे पर्यटन स्थळांकडे शुकशुकाट दिसत आहे.

# ओएनजीसी विरोधात आंदोलनाचा एल्गार



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण येथील ओएनजीसी प्रकल्पात कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या कामगारांच्या निवृत्तीनंतर त्याजागी यापुढे एकही कामगाराची भरती करण्यात येणार नाही, असा आदेशच ओएनजीसी प्रशासनाने काढला आहे. कामगारांच्या हिता विरोधात काढण्यात आलेल्या आदेशामुळे संतप्त झालेल्या कामगारांनी ओएनजीसी विरोधात आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. हा आदेश मागे घेण्यात यावा आणि कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी २९ जुलै रोजी काळ्या फिती लावून आस्थापनाचा जाहीर निषेध करणार असल्याचा इशारा मंगळवारी (दि.२३) आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेतून दिला आहे.

ओएनजीसी प्रकल्पात विविध प्रकारच्या कंत्राटी कामात स्थानिक सुमारे ४५० कामगार काम करीत आहेत. ठेकेदार बदलला तरी तेच कामगार काम करत असतात. मात्र, त्यांना कायमस्वरूपी कामगारांप्रमाणे वेतन, सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत नाहीत. यामुळे ओएनजीसी प्रशासन आणि कंत्राटी कामगार यांच्यातच संघर्षाची ठिणगी पडली आहे. या ठिणगींचे रुपांतर आंदोलनात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## विनयभंग प्रकरणी गजाआड

**म्हसळा :** तालुक्यातील ग्रामीण भागातील अल्पवयीन मुलगी दि.२१ जुलै रोजी सकाळच्या सुमारास सालविंडे पुलावरून जात असताना आरोपीने पीडितेचा हात पकडुन मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. या घटनेची तक्रार पिडीतीने म्हसळा पोलिस ठाण्यात केली. या घटनेचे गांभीर्य ओळखून स.पोलीस निरिक्षक संतोष आवटी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी व कर्मचारी पोलिसांनी आरोपीवर लागलीच कडक कारवाई करत आरोपी माज मुजीब तालिब (१९) याला गजाआड केले आहे.

# शैक्षणिक साहित्याचे वाटप




**। माणगाव । प्रतिनिधी ।**

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या पारिजात सेवाभावी संस्था मुंबईच्यावतीने शनिवारी (दि.२०) माणगाव येथील विकासा कॉलनीतील राजिप शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दप्तरे, वह्या, पेन, पेन्सिल इत्यादी शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. संस्थेचे पदाधिकारी वैभव कदम, विशाल कदम, दयाराम पाटणे, प्रफुल्ल पवार, निलेश थोरे यांच्या हस्ते विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. संस्थेने विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविल्याने संस्थेचे शाळेच्या माजी मुख्याध्यापिका गीतांजली शेळके, नीलम गायकवाड, सुनिता खेमनर, सोनाली कारोटे तसेच पालकांनी विशेष ऋण व आभार व्यक्त केले.

# माणगावात करिअर संसदेची स्थापना

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव येथील जे.बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टीकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये करिअर कट्टा या शासनाच्या उपक्रमाअंतर्गत करिअर संसदेची स्थापना करण्यात आली. यावेळी करीअर संसदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना करिअर कट्टा तालुका समन्वयक अशोक मोरे यांनी शपथ दिली. करिअर कट्टा या शासनाच्या योजने मार्फत प्रत्येक महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विध्यार्थ्यांना फक्त ३६५ रूपये भरून ३ वर्ष ऑनलाईन स्पर्धापरीक्षांच्या संदर्भात दररोज सायंकाली मार्गदर्शन केले जाते.

यामध्ये आयएएस आपल्या भेटीला, उद्योजक आपल्या भेटीला स्पर्धापरीक्षांचे स्वरूप पोलिस भरती संबंधी मार्गदर्शक असे विवीध उपक्रम राबविले जातात. आपल्या महाविद्यालयात देखिल करिअर कट्ट्याची स्थापना यापूर्वी करण्यात आल्याचे हर्शल जोशी यांनी सांगितले तसेच महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या एकुण ५० विध्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपली नोंदणी करण्याचे करिअर कट्टाचे समन्वयक डॉ. नितीन मुटकुले यांनी सांगितले.





# कुणबी समाजाचे शैक्षणिक कार्य

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा तालुका कुणबी समाज पश्चिम विभाग यांच्या मार्फत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी तालुका अध्यक्ष महादेव भिकू पाटील मार्गदर्शन करतेवेळी म्हणाले की, म्हसळा तालुका कुणबी समाज हे समाज हीत जोपासत असतांना पश्चिम विभाग कुणबी समाजाने शैक्षणिक कार्यात मदत करणारे आदर्श पाऊल उचलले, त्याचे आम्हाला मनस्वी आनंद होत आहे. या विभागाचे आदर्श अन्य तिन विभागांनी घ्यावे. त्या करीता नक्कीच आम्ही देखील मदत करु.

यावेळी महाड खाडी, कोळे, तळवडे, कुंभळे, पानवे, केलटे, नेवरूळ, जांभुळ अशा शाळांमधील १८० विद्यार्थांना प्रत्येकी ४ वह्या, पेन व पट्टी देऊन शैक्षणिक कार्यास हातभार लावण्याचे योगदान कुणबी पश्चिम विभाग अध्यक्ष धोंडू चव्हाण सचिव महेश पवार व त्यांचे पदाअधिकारी यांनी केले आहे. यावेळी महेंद्र धामणे, सदानंद पाखड, राजेंद्र भोगळ, शकर उंडरे, मधुकर पवार, सदानंद डिंगणकर, किसन पवार, शांताराम कोबनाक, वैभव शिगवण, संजय शिगवण, देवजी चव्हाण, भिकू चव्हाण, दौलत रटाटे तसेच ग्रामस्थ, महिला मंडळ, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुहास खामकरचे चित्रपट सृष्टीत पदार्पण

**। माथेरान । वार्ताहर ।**

शरीरसौष्ठवपटू सुहास खामकर यांनी भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजवले आहे. खेळाचे क्षेत्र पादाक्रांत करून आता त्यांनी कलाक्षेत्रात म्हणजे हिंदी चित्रपटसृष्टीत आपले पहिले पाऊल टाकले आहे. आता कलाक्षेत्र गाजवण्याचा त्यांचा मानस आहे.

गुरुपौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर या चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात करण्यात आली. यावेळी सुहास यांनी भिवंडी तालुक्यातील मराडेपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिराला भेट देऊन छत्रपतींचे शुभाशीर्वाद घेऊन आपल्या कामाला सुरुवात केली. या हिंदी चित्रपटात सुहास खामकर यांची आय. पी.एस. पोलीस अधिकारी अशी भूमिका आहे.

ड्रग्स तस्करीच्या विरोधात परदेशात जाऊन ते लढा देतात असे सर्वसाधारण कथानक या चित्रपटाचे आहे. हे चित्रीकरण या मंदिराच्या परिसरात करण्यात आले. यावेळी दिग्दर्शक साकार राऊत, निर्माते पंकज राऊत तसेच शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक राजू चौधरी, कैलास नीचिते, श्रीकांत गायकर उपस्थित होते.



## घरावर कोसळला विद्युत पोल

**नेरळ :** कर्जत तालुक्यात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे धामोते गावात बुधवारी (दि.२४) दुपारच्या सुमारास कैलास नागो विरले यांच्या घरावर विद्युत पोल कोसळ्याची घटना घडली आहे. सुदैवाने यामध्ये कुठलीही जीवित



हानी झालेली नाही. ज्यावेळी घरावर विद्युत पोल पडला त्यावेळी कैलास विरले यांचे कुटूंब घरातच होते. मात्र, वेळीच विद्युत पूवठा खंडित झाल्याने ओल्या जागेवर घराला करंट लागण्याची भीती होती. दैवबलवत्तर म्हणून विरले कुटूंब थोडक्यात बचावले. विद्युत पोल घराच्या छपरावर पडल्यामुळे घराचे नुकसान झाले आहे. हा पोल मुसळधार पाऊस आणि सुटलेला सोसाट्याचा वारा यामुळे पडल्याचे सांगण्यात आले आहे.

### मुरुड तालुका टिबी फोरम बैठकीत निर्धार

# प्रत्येक ग्रामपंचायत क्षयरोगमुक्त होणार

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

**क्षयरोग निर्मूलनासाठी चांगल्या प्रकारे काम करुन प्रत्येक ग्रामपंचायत क्षयरोग मुक्त करण्याचा निर्धार मुरुड पंचायत समिती नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांच्या अध्यक्षतेखाली व तालुका आरोग्य अधिकारी संतोष नारायणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय टीबी फोरम बैठकीत करण्यात आला.**




यावेळी गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, तालुका आरोग्य अधिकारी संतोष नारायणकर, मुरुड वैद्यकीय अधीक्षक उषा चोले, आरोग्य सेवक राजेंद्र चुनेकर, डॉ. मकबुल कोकाटे, डॉ. मयुर कल्याणी, डॉ. अमित बेनकर, डॉ. श्रेया पाटील, डॉ. फैजान मिस्त्री, प्राची चौलकर, राजेश वाडेकर, विजय वाघमारे, शुभांगी कोतवाल आदिंसह आशा सेविका, कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमा अंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायत क्षयरोग मुक्त करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असुन यासाठी तालुका व गावपातळीवर काम केले जाणार आहे. या बाबत कार्यक्रमाची रुपेषा ग्रामपंचायत स्तरावर केली जाणार आहे. क्षयरुग्णाची तपासणी, क्षय रोगावरील उपचार, रोगप्रसार कसा थांबवावा त्याकरिता तालुका टिबी फोरम प्रमाणेच प्रत्येक ग्रामपंचायतीत सरपंचाच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत टिबी फोरमची स्थापना केली जाणार आहे. प्रत्येकांनी ग्रामपंचायतस्तरावर क्षयरोग निर्मूलना बाबत जनजागृती करावी, अशी माहिती अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांनी दिली.

#### ■ कार्यक्रमाची रुपरेखा ग्रामपंचायत स्तरावर

तालुक्यात ४२ टिबीचे रुग्ण होते. ४ रुग्णांनी क्षयरोगवर मात करुन पुर्णतः बरे झाले आहेत. आता सध्यासिध्दीत ३८ रुग्ण क्षय रोगावर उपचार घेत आहेत. क्षयरोग नियंत्रणात ठेवण्याकडे आरोग्य विभागाकडुन प्रयत्न सुरू आहेत. अशी माहिती मुरुड ग्राशीण रुग्णालयाचे आरोग्य अधिक्षक उषा चोले यांनी दिली. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र चुनेकर यांनी केले.



## मुरुड-रोहा मार्गावर झाड कोसळले

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड-रोहा मार्गावर खार आंबोली येथे शेकडो वर्षे जुने असलेले वडाचे झाड बुधवारी (दि.२४) पहाटेच्या सुमारास कोसळल्याची घटना घडली. यामुळे या मार्गावरून होणारी वाहतूक ठप्प झाली होती. या मार्गावरील रोह्याकडील वाहतूक पर्यायी केळघर मार्गाने वळविण्यात आली होती. तर इंदापूर, माणगाव, म्हसळाकडे जाणाऱ्या वाहतुकीला राजपुरी मार्गे वळविण्यात आले होती. यावेळी दोन जेसीपी, दोन कटर मशिनच्या सहाय्याने सुमारे पाच तासांच्या प्रयत्नांनंतर झाड हटविण्यास यश आले. त्यानंतर दुपारी १२:३० ला वाहतूक सुरळीतपणे सुरू करण्यात आली.

# जिल्हा रुग्णालयाला गळती

## सर्जिकल आणि मेडिकल वॉर्डमध्ये साचले पाणी

**। अलिबाग । प्रतिनिधी । गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. पावसामुळे जिल्हा सामान्य रुग्णालयाला गळती लागली आहे. पावसाचे पाणी मेडिकल व सर्जिकल महिला कक्षामध्ये पडत आहे. या पाण्याच्या गळतीपासून बचाव करण्यासाठी प्लास्टीक बादल्यांचा आधार घेण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. मागील आठवड्यात देखील पावसाचे पाणी सर्जिकल वॉर्डमध्ये घुसले होते. या वॉर्डला तळ्याचे स्वरूप आले होते.**



**रुग्णांचा नातेवाईक सुदैवाने बचावला**

अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात आपल्या नातेवाईकांना पाहण्यासाठी एक इसम आला होता. त्याच्या सोबत त्याचा तीन वर्षाचा लहान मुलगादेखील होता. पावसाची रिपरिप सुरु होती. रुग्णालयाच्या आवारात मुलाला घेऊन जात होता. पाण्याच्या अंदाज न आल्याने तो आवारात असलेल्या नाल्यामध्ये पडला. सुदैवाने तो नाल्यातून सुखरूप निघाला. परंतु त्याच नाल्यात त्याचा मुलगा पडण्याच्या स्थितीत होता. परंतु त्याने सतर्कता दाखवत मुलाला नाल्यात पडण्यापासून बचावल्याचा प्रकार नुकताच घडला.

अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालय अडीचशे खाटांचे आहे. रुग्णालय ३८ वर्षे जुने आहे. रुग्णालयाच्या इमारतीची अवस्था बिकट झाला आहे. स्लॅब कोसळणे, पाण्याची गळती होणे अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत आहे. करोडो रुपये खर्च करून सध्या रुग्णालयाची दुरुस्ती केली जात आहे. ते काम संथगतीने सुरु आहे. गेली अनेक दिवसांपासून जिल्ह्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे. अतिवृष्टीचा फटका जिल्ह्याला बसत आहे. महिला वैद्यकिय कक्षामध्ये पावसाच्या पाण्याची गळती मोठ्या प्रमाणात होत आहे. त्या भागात पाणीच पाणी होऊ लागले आहे. या गळती पासून बचाव करण्यासाठी प्लास्टीकच्या बादल्यांचा आधार घेण्याची वेळ रुग्णालयावर आली आहे. काही ठिकाणी काम चालू आहे. त्यामुळे खिडक्या उघड्या आहेत.

त्या खिडक्यांमधून पावसाचे पाणी रुग्णालयात शिरत आहे. रुग्णालयात पाणी पडत असल्याने रुग्णांसह कर्मचाऱ्यांचेदेखील हाल होत आहे. या पावसाच्या पाण्यापासून बचाव करण्यासाठी वेगवेगळे प्रयोग केले जात आहे. त्यामध्ये सर्जिकल वार्डजवळ प्लास्टीक कापड लावण्यात आले आहे. पावसाचे पाणी आतमध्ये येऊ नये यासाठी हा प्रयोग केला आहे. परंतु त्यावर ठोस उपाय करण्यास प्रशासन उदासीन ठरत असल्याचे चित्र आहे.

> **सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दुरुस्तीचे काम सुरु आहे. रुग्णालयातील तीन वॉर्डमध्ये पाणी गळती आहे. त्याठिकाणी प्लॉस्टीक कापड लावले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागालादेखील कळविले आहे. त्यांच्याकडूनदेखील पाहणी करण्यात आली आहे.**
> **डॉ. निशीकांत पाटील**
> **– अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक**


# चिल्हार नदी परिसरातील गावांनी अनुभवला महापूर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

उन्हाळ्यात कोरड्या असलेल्या चिल्हार नदी परिसरातील गावांनी नदीला आलेला महापूर अनुभवला. या नदीला पहिल्यांदा सर्वात मोठा पूर आला आणि त्यावेळी अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद पडले.

मोग्रज भागात उगम पावणारी चिल्हार नदी पाथरज भागातून बोरिवली, गुडवण अशी कोलीवली येथे उल्हास नदीला जावून मिळते. या नदीच्या आसपास असलेल्या अनेक गावात या नदीला आलेल्या महापुराच्या पाणी कधी गेले नव्हते. यावर्षी पहिल्यांदा उल्हासनदीचे उप नदी असलेल्या चिल्हार नदी पात्रातून महापुराच्या पाणी आजुबाजुचे गावात शिरण्याचा घटना घडल्या. या नदीवरील किकवी, नालढे, अंथरट आणि पिंपलोळी येथील पूल महापुराच्या पाण्यात बुडले होते.

**रस्ते बंद, भातशेतीचे नुकसान**



तर महापुराच्या पाणी या नदीच्या काठावर असलेल्या वाकस, चोरावले, कोलीवळी, पिंपलोळी, बोरिवली, सुगवे, अंथराट, गुडवण, नालढे आणि किकवी गावांच्या सखल भागात शिरले होते.तर महापुराच्या पाण्याने शेकडो एकर भाताची शेती पाण्याखाली गेली असून भाताच्या शेतीचे मोठे नुकसान केले आहे. या नदीला एवढ्या मोठ्या प्रमाणात महापूर येण्याची पहिलीच घटना असून नदीचे पाणी आजुबाजूच्या गावांना जोडणाऱ्या रस्त्यांवर आल्याने कशेले खांडस रस्ता,नेरळ गुडवण रस्त्याची वाहतूक किकवी, काळे वाडी, अंथरूट, पिंपलोळी येथे रस्त्यावर पाणी आल्याने बंद झाली होती.

# बल्लाळेश्वर मंदिराकडे जाणारा रस्ता खडतर

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

बल्लाळेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. नगरपंचायतीतर्फे तात्पुरती उपाययोजना म्हणून खडी टाकण्यात आली होती. मात्र, ही खडी बाहेर येऊन पुन्हा खड्डे पडले असून, पावसाचे पाणी साठून त्यांना तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. परिणामी मार्ग काढताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.




काही दिवसांपूर्वी खड्डे भरण्यासाठी टाकलेल्या खडीवरून घसरून पाच ते सहा बाईकस्वार जखमी झाले होते. वाहने जाऊन आता ही खडी आजूबाजूला पसरली असून, त्या ठिकाणी आणखी मोठे खड्डे तयार झाले आहेत. तसेच या खड्ड्यांमध्ये पाणी साचून राहते. त्यामुळे वाहतुकीला व चालण्यास अडथळा निर्माण होत आहे. शिवाय, खड्ड्यात वाहने जोरात आदळतात, तसेच खड्ड्यातील पाणी आजूबाजूला असलेल्या दुकानांत व पादचाऱ्यांवर उडून त्यांना हकनाक त्रास सहन 0करावा लागतो.

# वावंढळ तलावाला धोका

## संरक्षण भिंत न झाल्यास तलाव वाहून जाईल

**। रसायनी । वार्ताहर ।**

वावंढळ तलावाच्या दोन्ही बाजूला नैसर्गिक नाले वाहत असल्याने मातीच्या संरक्षण भिंतीला असलेली माती दगड पडल्याने तलावाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे कायमस्वरूपी संरक्षण भिंतीचे काम करावे अशी मागणी करण्यात येत आहे.



चौक वावंढळ गावात शिवकालीन तलाव आहे,साधारण सहा एकर तळ्याची जागा आहे, अशी प्राथमिक माहिती आहे. पूर्वी पासुनच तलावाच्या एका बाजूने नैसर्गिक नाला वाहत आहे, भिलवले गावापासून ते ठाकुर वाडी आणि पूर्ण डोंगराचे पाणी या नैसर्गिक नाल्यातून पावसाळ्यात वाहत असते. दुसऱ्या बाजूला असलेल्या नाल्या अगोदर एक छोटा तलाव आहे, हा तलाव पुर्ण भरला की पाणी यातून पाणी वाहत जाते. तलावाच्या वरील भागात व वावंढळ परिसरात सद्या काही जमिनी मोकळ्या राहिल्या आहेत.

काही ठिकाणी बांधकाम सुरू आहेत,काही ठिकाणी पाण्याला जाण्यासाठी मार्ग न ठेवल्याने, जमिनीची धूप, जमिनीची चोरून विकलेल्या माती मूळे मुळ पाण्याचा प्रवाह बदलत गेला आहे,आणि हे सर्व पाणी तलावात मोठ्या प्रमाणात येत आहे. तलावाच्या दुसऱ्या बाजूला खाजगी मालकाने त्याच्या जमिनीत उंच संरक्षण भिंत बांधल्याने पाणी तलावाच्या कडेने जोरदार पणे वाहात आहे. त्यामुळे तळ्याच्या बांधावरच्या दगडी माती वाहून जात आहे.तलावाच्या ऐंशी टक्के बांधाच्या कडेने पाणी वाहत जात असल्याने तेथे धूप होण्यास सुरूवात झाली आहे.गेले काही दिवस जोरदार पाऊस पडल्याने पाण्याचे प्रमाण अधिक वाढले आहे.

सन २०१९ साली तत्कालीन सरकारने या तलावाच्या पुनर्बांधणीसाठी सुमारे अडीच कोटी रुपये मंजूर केले असून तलावाचे खोद काम न करता अर्धवट रेलिंग आणि आतील भिंतीचे काम करण्यात आले आहे. त्याच प्रमाणे बाहेरील भागात फेवर ब्लॉक बसविण्यात आल्याने तलावाची शोभा वाढली आहे. पण बाहेरून संरक्षण भिंत बांधून न झाल्यास तलाव वाहून जाण्याची शक्यता आहे.

# कोलाडमध्ये अनेकांच्या घरात पाणी



**। कोलाड । वार्ताहर ।**

गुरुवारी रात्री सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे कोलाड, हद्दीत रात्री दोनच्या सुमारास अनेकांच्या घरात पाणी शिरले होते. कोलाड पोलिसांमार्फत नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता. रेस्क्यू टीमकडून बचावकार्य करण्यात आले. यादरम्यान वीजपुरवठाही खंडित झाला होता.

कुंडलिका नदीने रात्री एकच्या सुमारास धोक्याची पातळी ओलांडली होती. त्याचाच फटका कोलाड परिसरातील गावांना बसला असून, गोवे, पुई, कॉलनी स्टॉप,आंबेवाडी, संभे, पाले खुर्द, डिव्हिजन कॉलनी रोड, तटकरे कॉमपेक्स, संजय गांधी नगर रोहा कोलाड रोडवर पाणी आले होते. यात अनेकांच्या घरात पाणी शिरले असून, त्यांच्या घरातील सामानाचे नुकसान झाले आहे. खबरदारीचे उपाय म्हणून महसूल प्रशासन, कोलाड पोलिसांच्या मार्फत नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, पावसासह वादळ असल्याने वीजपुरवठा काही काळ खंडित झाला होता. तर गोवे येथील रुपेश गोविंद गायकवाड यांचाही वाडा कोसळला आहे.

# वाघिणी वाडीतील ग्रामस्थ बचावले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या शेलू ग्रामपंचायतीमधील दुर्गम भाग असलेल्या वाघिणीचे वाडीमधील रहिवाशांना स्थानिकांनी सुखरूप बाहेर काढले.



ठाणे जिल्ह्यातील वांगणी येथून जावे लागत असलेली वाघिणीचे वाडी ही दुर्गम भागात वसली आहे. या वाडीमध्ये जाण्यासाठी साधारण दोन किलोमीटर अंतराची पायवाट असून, वन विभागाची जमीन असल्याने त्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता बनविता आलेला नाही. त्यात बेडीसगाव येथून वाघिणीचे वाडीमध्ये जाण्यासाठी एक मोठा नाला पार करावा लागतो.गुरुवारी सकाळी तेथील काही रहिवासी नाला ओलांडून घरी जाण्याचा प्रयत्न करीत असताना अडकले. नाल्यातून वाहत असलेल्या पाण्याचा प्रवाह प्रचंड असल्याने बेडीस गावामधील वरच्या वाडीमधील आदिवासी बांधवांनी मदतीसाठी धाव घेतली. त्यावेळी विनोद धूमने आणि अन्य सहकारी यांनी वाघिणीचे वाडीमधील आदिवासी ग्रामस्थांना सुखरूप बाहेर काढले. त्यामुळे पाण्यातून वाहून जाता-जाता त्या सर्वांचे प्राण वाचले असून, नेरळ पोलीस ठाण्याचे कर्मचारीदेखील तेथे पोहोचल्याने त्यांचीदेखील मदत होऊ शकली.

# रस्ते झाले जलमय, शेती पाण्याखाली



**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

पाताळगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून, पूल पाण्याखाली गेला. यामुळे सर्व खासगी आणी सरकारी शाळेला सुट्टी जाहीर करण्यात आली. मात्र, काही शाळांना कल्पना नसल्यामुळे मुले शाळेतून घरी आल्याचे पहावयास मिळत होते.

मुसळधार पावसामुळे धरण क्षेत्रामध्ये वाढ झाली आहे. त्यासबरोबर शेतीच्या कामाला ब्रेक लागला असून, या पुराच्या पाण्यामध्ये आपली शेती टिकून राहील की नाही याची चिंता शेतकऱ्यांना सतावू लागली आहे. भातलागवड केलेल्या ठिकाणी जणू तलावाचे स्वरुप प्राप्त झाल्याचे पहावयास मिळाले. यामुळे भातशेती कुजली जाऊ शकते, असा प्राथमिक अंदाज शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# पाली भुतीवली धरण ओव्हरफ्लो

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील रेल्वे पट्ट्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी आणि त्या भागातील जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी बांधण्यात आलेला पाली भुतीवली येथील लघुपाटबंधारे प्रकल्प गुरुवारी ओव्हरफ्लो झाला. गतवर्षी ३१ जुलै रोजी हे धरण पूर्ण क्षमतेने भरून वाहू लागले होते.



माथेरान डोंगरातून येणारे पाणी अडवून ते उन्हाळी भातशेतीसाठी देण्याकरिता पाली भुतिवली या दोन गावांचे विस्थापन करून लघुपाटबंधारे प्रकल्प बांधण्यात आला होता.१०० एमएलडी क्षमता असलेले हे धरण गतवर्षी ३१ जुलै रोजी भरले होते. यावर्षी पाच-दहा दिवस आधीच धरण ओव्हरफ्लो झाले असून, शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. सकाळच्या वेळी धरणाचे पाणी पाहण्यासाठी गेलेले स्थानिक रहिवासी सचिन गायकवाड आणि वैभव भगत यांच्यासमोर धरणाचे पाणी ओव्हरफ्लो झाले. त्यावेळी धरणातील पाण्याबरोबर असंख्य मासे उड्या मारून खाली आदळत होते.

# झाड कोसळून तरुण गंभीर जखमी

**। पनवेल । प्रतिनिधी।**

कामावरून घरी जात असताना झाड अंगावर कोसळल्याने तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अशोक किसन चव्हाण (३५) असे जखमी तरुणाचे आहे, ही घटना सीबीडी बेलापूर येथे घडली.

कामोठे येथील अशोक चव्हाण हे सीबीडीमध्ये एका खासगी प्रयोगशाळेत कामाला आहेत. दुचाकीने कामोठे येथे घरी जात असताना सीबीडी सेक्टर चार येथील रस्त्याच्या कडेला असलेले झाड त्यांच्या अंगावर कोसळले. यावेळी जवळपास असलेल्या नागरिकांनी अग्निशमन केंद्राला माहिती दिल्यानंतर त्याला तात्काळ सीबीडी येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. झाड अंगावर कोसळल्याने अशोक यांच्या डोक्यावर, मानेवर गंभीर दुखापत झाली आहे.

# कर्जत-कोंडिवडे रस्ता बंद

## आडीवली, मोहीली गावात पाणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

उल्हास नदीला रात्रीपासून पूर आला आहे. त्या पुरामुळे तालुक्यात पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. मात्र, शासनाने परवानग्या दिल्याने उल्हास नदी पात्रात दगडी भिंत बांधण्यात आली आणि त्यामुळे कर्जत-कोंडीवडे रस्ता वाहतुकीस २४ तास बंद होता. तर त्या भागात घालण्यात आलेल्या भिंतीमुळे उल्हास नदीच्या परिसरात असलेल्या आडीवली आणि मोहिली गावातील काही घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले.

आडीवली परिसरात खासगी बोट कंपनीने जमीन विकत घेतली आहे. मात्र, आपली काही जमीन सध्याच्या नदी पात्रात आहे आणि त्यामुळे त्या खासगी जमीन मालकाने शासनाच्या परवानग्या घेऊन नदी पात्रात २०० मीटर लांबीची भिंत घातली. स्थानिक प्रशासनाने त्या ठिकाणी भिंत बांधण्यासाठी परवानगी दिली नव्हती आणि तरीदेखील वरिष्ठ कार्यालयांनी कोणत्या आधारे परवानगी दिली. उल्हास नदीचे पूर रेषा यांचा विचार न करता बांधकाम सुरू केले. नदी पात्रात बांधकाम सुरू झाल्यापासून स्थानिक ग्रामस्थांनी तहसीलदार आणि पाटबंधारे यांच्याकडे तक्रारी करून आक्षेप घेतला होता. मात्र त्या भिंतीमुळे मागील १५ दिवसात दोनदा आडीवली येथे कर्जत कोंडिवडे रस्ता वाहतुकीस बंद झाला होता. रात्रीपासून रस्त्यावर पाणी साचले होते आणि मोहीली पुलावरून पाणी वाहून जात असल्याने ते पाणी आजुबाजूच्या गावातील घरांमध्ये देखील पोहोचले.

# पुरात अडकली चारचाकी



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

काळुंद्रे नदीवरील पुलावर पुराच्या पाण्यात चारचाकी अडकल्याची घटना घडली. या पुलावरून गाडीचा चालक रोज प्रवास करतो, पण गुरुवारी पुराच्या पाण्याचा अंदाज न आल्याने पुलाच्या मधोमध ही चारचाकी अडकली. चालकाने त्यातून बाहेर पडून आपला जीव वाचवला आहे.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- Tally अकाऊंट कामाचा अनुभव असलेली लेडीज हवी आहे. ८००७८३३२३२ झिराड, पगार १८०००/२१०००
- सेल्समन पाहिजे : अलिबाग येथे हुशार मेहनती व स्वत:ची मोटरसायकल असलेला सेल्समन हवा आहे. पगार- दहा हजार व इतर सुविधा. संपर्क : ९४२२६९६२३५
- Requires DTP operator- Male/Female expert in English Typing/major work From Home-send cv on drssphulari@gmail.com with salary Expectation.
- नागाव मधील हॉटेलमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत. ऑलराऊंड कुक, कुक हेल्पर, कॅप्टन, वेटर, मोरीवाला, मंडईवाला इत्यादी. मो. ७८२२०८३३८१
- टॅली व GST चा अनुभव असलेली मुलगी हवी आहे. झिराडला बिल्डींग मटेरियल दुकानात. पगार रू. १५०००-२००००, मो. ९४२१९५४३४८
- अलिबाग ब्राह्मण आळी, युनियन बँकेशेजारील नवीन इमारतीमधील ९५० व ५०० स्क्वे. फूट क्षेत्रफळाचे दोन व्यापारी गाळे एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. ९९७०६६६२०३
- कुकूचकू पोल्ट्री फार्म प्रा.लि. निझामपूर, माणगाव येथे हॅचेरी व ब्रीडर फार्म येथे १२ वी शिकलेले मुलगे सुपरवायझर्स पाहिजेत. पगार : १२०००/- ऑफिसमध्ये १५ वी शिकलेले मुलगा मुलगी पाहिजे. पगार १५,०००/- संपर्क- अनुष्का राऊत ७७९८८८३८६४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## सतर्क राहण्याचे नागरिकांना आवाहन

# पालीला पावसाने झोडपले; अंबा नदीला महापूर



**। रायगड । वार्ताहर ।**

पाली सुधागडात पावसाने हाहाकार माजवला आहे. सर्वत्र पुरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून नद्यांना पूर येऊन जनजीवन विस्कळीत झाले.

अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली परिणामी गुरुवारी (ता.२५) पहाटे दोन वाजल्यापासून वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावरील पाली अंबा नदी पुलापासून दोन्ही बाजूची वाहतूक बंद झाली होती. दुपारी दोन नंतर देखील ही वाहतूक ठप्प होती. तसेच अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले होते.

**वीज पुरवठा खंडित, इंटरनेट सेवा ठप्प**

सकाळपासूनच पालीसह इतर गावातील काही ठिकाचा विजपुरवठा खंडित झाला होता. याशिवाय सर्व ठिकाणचे मोबाईल नेटवर्क तसेच इंटरनेटचे नेटवर्क स्लो झाले होते. तर काही कंपन्याचे नेटवर्क गुल देखील झाले. यामुळे नागरिकांची गैरसोय झाली.

पाली अंबा नदी पुलाजवळ दोन्ही बाजूला जोड रस्त्यावर सखल भागात पाणी भरले होते. हे पाणी पाली मिनीडोअर स्टॅन्ड तसेच उन्हेरे फाटा इथपर्यंत आले होते. यामुळे येथील दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प होती. दोन्ही बाजूला वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या. तसेच याच मार्गावर खोपोली बाजूकडे मोर टाक्याजवळ देखील रस्त्यावर पाणी साचल्याने तेथेही वाहतूक खोळंबली होती. दुपारी बारा नंतर पाणी ओसरल्यावर येथून वाहतूक सुरू झाली. मात्र पाली अंबा नदी पुलाच्या दोन्ही बाजूच्या रस्त्यावर पाणी असल्यामुळे ही वाहने पुन्हा त्या ठिकाणी अडकून पडली. यावेळी खाजगी वाहने, एसटी बस, ट्रक टेम्पो आदी मालवाहू वाहने दुचाकीस्वार व प्रवासी व चाकरमानी अडकून पडले होते.

> **अंबा नदीवरील पूलाच्या दोन्ही बाजूकडील पाणी असताना नागरिकांनी खबरदारी म्हणून सदर पुलाचा वापर करू नये. येथील वाहतूक तूर्तास थांबवण्यात आलेली आहे. पाणी ओसरल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात येईल. या ठिकाणी पोलीसदेखील तैनात ठेवण्यात आले आहेत. तसेच प्रशासनातर्फे नागरिकांना खबरदारीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**
> **– उत्तम कुंभार, तहसीलदार, पाली–सुधागड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे- मोठे वेणगाव तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| सुनिता मनोहर हाइप | ७७/१/अ | ०-५१-५० हे आर पॉ | ९-१९ |
| दिनेश नामदेव भगत | ७७/१/ब/१ | ०-२६-५० हे आर पॉ | ४-१९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २६/०७/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९**
ऑफिस पत्ता - शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. : -११९ / २०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. इरफान अब्दुल लतीफ कर्जीकर
वय ६१ वर्षे, धंदा : शेती. — अर्जदार
रा. मु. पो. मांजरवणे,
ता. माणगांव, जि. रायगड

**विरुध्द**

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मांजरवणे, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. इरफान अब्दुल लतीफ कर्जीकर यांचा जन्म मौजे मांजरवणे, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०१/०६/१९६३ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. ०२/०७/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मांजरवणे, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०१/०६/१९६३ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. इरफान अब्दुल लतीफ कर्जीकर यांचा जन्म मौजे मांजरवणे, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०१/०६/१९६३ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव — सही/-
ता. २५/०७/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. : -१२०/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. रजीया हसन राऊत
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. रजीया इरफान करजीकर
लग्नानंतरचे नाव
वय ५६ वर्षे, धंदा : गृहिणी — अर्जदार
रा. मु. पो. मांजरवणे,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रामपंचायत साई, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम.रजीया हसन राऊत-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. रजीया इरफान करजीकर-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे साई, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २७/११/१९६८ रोजी राहत्या घरी झाला. तिची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला जावक क्र. ११६/२०२४ ने दि. २५/०६/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार हिने या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे साई, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २७/११/१९६८ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. रजीया हसन राऊत-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. रजीया इरफान करजीकर लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे साई ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २७/११/१९६८ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव — सही
ता. २५/०७/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस हया जाहीर नोटीसीने कळवण्यांत येते की, खाली नमुद केलेल्या ''मालकांचे नांव'' या सदराखाली नमुद केलेल्या बिनशेती मिळकती त्यांचे खुद, ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीत असून, त्यांची नांवे सरकार दप्तरी कबजेदार सदरी नोंद केलेली आहेत. सदर मिळकती हया निर्वेध आहेत, असा भरवसा सदरहू मालक/कबजेदार यांनी दिला आहे. सदरहू मिळकती आमचे अशिल भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि., नोंदणीकृत पत्ता, बिझनेस प्रोसेस एक्सलंस सेंटर, प्लॉट नं. ६, सेक्टर २ सिडको गार्डनच्या मागे, खारघर, नवी मुंबई ४१० २०६, यांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून दिर्घ मुदतीच्या भाडेपटटा कराराने घेण्याचे ठरविले आहे. त्याकरीतां आवश्यक तो 'सदरहू मालकांचे' मालकी संबंधी निर्वेधते संबंधीचा दाखला 'टायटल सर्टीफिकेट' देण्याची विनंती आमचे अशिलांनी मला वकील नियुक्त करुन केली आहे व त्याचाच भाग म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द करण्याचे प्रयोजन आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे-लोणारे, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत**

| जमिन मालकांचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| निशांत सुभाष गायकवाड | २५/७/२ | ०-२०-०० | ५.०० |

तरी सदरहू मालक/कबजेदार यांचे व्यतिरिक्त खाली सदरहू मिळकतीं संदर्भात कोणाचाही दान, गहाण, बक्षीस फरोक्त साठेकरार, लिन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र निवारा कुळ वहिवाट, ताबा कबजा, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त जप्ती, संपादन रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा कसलाही व कोणताही हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून १४ दिवसांचे आत खालील सहया करणार वकील यांजकडे लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास व मागाहून येणाऱ्या हरकती हया जाणीवपुर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरच्या मिळकती पुर्णपणे निर्वेध, बोजारहित असल्याचे गृहीत धरुन तशा निर्वेधतेचा दाखला खाली सहया करणार वकील देतील व त्याअनुषंगाने आमचे अशिल सदरहू मिळकतीचा दिर्घ मुदतीच्या भाडेपटट्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल — **विरेंद्र त्रि.कुळकर्णी**
दि. २४/०७/२०२४ — ॲडव्होकेट, पनवेल

पत्रव्यवहाराचा पत्ता:- फ्लॅट नं. १/५०१-५०२, नील पार्क, तालुका पोलिस स्टेशन जवळ, ता.पनवेल,जि. रायगड. ४१० २०६, फोन नं. २७४६०४८३

## जाहीर नोटीस

**मुरुड येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयांत**

क्रि.चौ.अर्ज. १३०/२०२४

मुजफ्फर मोहम्मद अली चोगले, ...अर्जदार

विरुध्द

मा. ग्रामसेवक सो.,
ग्रुप ग्रामपंचायत विहूर, ... सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांचा जन्म दि. ०१/१२/१९६० रोजी गांव- विहूर, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झालेला असुन त्यांची ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत विहूर, ता. मुरुड, जि. रायगड यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड तहसिल न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६९ चे कलम १७ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा जन्म दि. ०१/१२/१९६० रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. १३/०८/२०२४ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांना त्यांची स्वतः ची जन्म नोंद ही जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.९/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**रोहन शिंदे**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

दिनांक २४.०७.२०२४

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी श्री. अल्ताफ अहमंद सफात अहमद शेख यांच्या मालकी वहिवाटीच्या मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेली जमीन मिळकत आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

**मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| खाते क्रं. | भुमापक क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| २६६ | ७० | ०-७८-२० पो.ख ०-०६-८० | ७.८७ |
| | ७१ | १-७०-२० पो. ख ०-१८-०० | १४.८१ |
| | ७२ | ०-१७-०० पो. ख ०-२-०० | ०.१९ |
| | ७८ | १-०२-४० पो. ख ०-२०-०० | ९.१९ |

वर नमूद केलेल्या संपूर्ण जमीन मिळकती श्री. अल्ताफ अहमंद सफात अहमद शेख यांच्या मालकी वहिवाटी व ताबे कब्जे मध्ये असुन यांच्या कडून माझे अशिल यांनी कायम स्वरूपी खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतींचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अटॅचमेट, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवण्यात यावे. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बोजारहित आहे. असे समजुन माझे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सही/-
**श्री. पचप्पा इ. गोपाले**
ॲडव्होकेट, बीएसएलएलएलबी
ऑफिस : ५२०/५२१, अरेंजा कॉर्नर
प्लॉट नं. ७१, सेक्टर-१७, वाशी
नवी मुंबई, ४००७०३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की,
१) मिळकतीचे वर्णन-

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. | गाव |
|---|---|---|---|
| ५२ | १२.१४.६० पो.ख. ०१.७३.४० एकूण १३.८८.०० | २१.९४ | वाघोली वाडी, ता. अलिबाग जि. रायगड |

सदरील मिळकतीपैकी दक्षिणेकडील ४.६२.०० हे.आर. इतकी जमीन या नोटीसीचा विषय आहे.

आमचे अशिल १) सुरेश काशिनाथ गजने २) किसन काशिनाथ गजने, दोघे राहणार सुतारपाडा, पो. कामार्ले ता. अलिबाग, जि. रायगड यांनी वर नमूद नोटीस विषय असलेल्या मिळकतीबाबत अलिबाग येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश-१ यांचे कोर्टात रेग्युअर दिवाणी मुकदमा नं. १४८/२०२२ हा दिवाणी दावा दाखल केला आहे. सदरील दाव्यामध्ये आमचे अशिलांनी सदरील नोटीस विषय असलेल्या मिळकतीचे ते विरुद्ध कब्जाने मालक झाले आहेत. व सदरील मिळकत ही त्यांचे मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील आहे असे मे. न्यायालयाकडून ठरवून मागितले आहे, तसेच सदर नोटीस विषय असलेल्या मिळकतीबाबत झालेली दि. ३१/१२/२०१०, १८/३/२०१४, १७/४/२०१४, २/९/२०१६, १४/१/२०२० व दि. १०/५/२०२१ रोजीची दस्त त्यांच्यावर बंधनकारक नाहीत असा जाहीर ठराव व तूर्तातूर्त मनाई हुकुमाची मागणी केली आहे. तसेच इतर अनुषंगिक मागण्या मे. न्यायालयाकडे केलेल्या आहेत. सदरील दाव्याचे कामकाज मे. न्यायालयात चालू आहे.

वर नमूद मिळकतीपैकी दक्षिणेकडील ४.६२.०० हे आर. इतकी जमीन आमचे अशिलांचे मालकी वहिवाटीत व प्रत्यक्ष ताबेकब्जात आहे, परंतु सदरील नोटीस विषय असलेल्या मिळकतीचे सातबारा सदरी व हक्कनोंदपत्रकी सिद्धार्थ दिलीप वडके, अशिष वसंतराव मांधळे व अंजली जयदेव मोदी यांचे नावाची बेकायदेशीर नोंद आहे. याचा गैरफायदा घेऊन ते सदरील जमिनीची विक्री अगर हस्तांतरण करण्याच्या विचारात आहेत असे आमचे अशिलांस समजले आहे.

तरी या नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, वर नमूद नोटीस विषय असलेल्या मिळकतीबाबत साठेकरार, विक्रीकरार, खरेदीखत, गहाण, दान, बक्षीस अगर अन्य कोणत्याही प्रकारचा अगर कसलाही व्यवहार करू नये. तसे केल्यास सदरचा व्यवहार हा बेकायदेशीर असेल व तो आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे.

सही/-
अशिलांतर्फे वकील
**ॲड. शैलेश ज्ञानेश्वर मोकल**
जिल्हा न्यायालय रायगड, अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, मौजे नसरापुर, तालुका कर्जत, जिल्हा-रायगड येथील स्वाली सविस्तरपणे नमुद केलेली शेतजमिन मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालक १) मनिषा रमेश बोराडे, २) रमेश सुर्याजी बोराडे यांचेकडून कायम खरेदी करण्याचे निश्चित ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे नसरापुर, तालुका कर्जत, जिल्हा - रायगड**

| अनु. क्रं. | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १ | ३३/९ | ०-१३-०० | ०.२२ |
| २ | ३३/१० | ०-१९-०० | ०.२८ |
| ३ | ३३/११ | ०-२१-०० | ०.३१ |
| ४ | ३३/१९ | ०-०६-०० | ०.०६ |
| ५ | ३३/२० | ०-१०-०० | ०.१२ |
| ६ | ३३/२१ | ०-१६-०० | ०.२२ |
| ७ | ३३/२३ | ०-०८-०० | ०.०९ |
| | **एकूण** | **०-९३-००** | |

तरी सदरहू वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल — **विरेंद्र त्रि.कुळकर्णी**
दि. २२/०७/२०२४ — ॲडव्होकेट, पनवेल

पत्रव्यवहाराचा पत्ता:- फ्लॅट नं. १/५०१-५०२, नील पार्क, तालुका पोलिस स्टेशन जवळ, ता.पनवेल, जि. रायगड. ४१० २०६, फोन नं. २७४६०४८३


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटिक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालयात**
**(तहसिलदार कार्यालय, मुरूड जंजिरा, दरबार रोड, ता.मुरूड, जि.रायगड)**

ज.म.र.अर्ज १२५/२०२४

## जाहीर नोटीस

प्रति,
श्री.अमित दत्तात्रेय पुलेकर, — अर्जदार
रा.दांडे नांदगाव, ता.मुरूड जंजिरा रायगड
विरूद्ध
ग्रुप ग्रामपंचायत उसरोली — सामनेवाला
ता.मुरूड जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अमित दत्तात्रेय पुलेकर अर्जदार यांचा जन्म दि.३०/११/१९७७ रोजी मौजे उसरोली, ता.मुरूड जि.रायगड येथे झालेला असून त्यांच्या जन्माची नोंद उसरोली यांचा जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲन्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अमित दत्तात्रेय पुलेकर ३०/११/१९७७ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाची ही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे.न्यायालयात दि.२०/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार श्री.अमित दत्तात्रेय पुलेकर यांचा जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये मृत्यूची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.१८/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरूड जंजिरा**

## जाहीर नोटीस

**मुरुड येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयांत**

क्रि.चौ.अर्ज. १२८/२०२४

दिलशाद मोहम्मद अली चोगले, (लग्नापुर्वीचे नांव)
दिलशाद खालीद कादिरी, (लग्नानंतरचे नांव) ...अर्जदार
विरुध्द
मा. ग्रामसेवक सो.,
ग्रुप ग्रामपंचायत विहूर, ... सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांचा जन्म दि. ०१/०५/१९६७ रोजी गांव-विहूर, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झालेला असुन त्यांची ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत विहूर, ता. मुरुड, जि. रायगड यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड तहसिल न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६९ चे कलम १७ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा जन्म दि. ०१/०५/१९६७ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. १३/०८/२०२४ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांना त्यांची स्वतःची जन्म नोंद ही जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ९/०७/२००४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**रोहन शिंदे**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीन मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. कुणाल प्रकाश भट्टे व २) श्रीमती कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याबाबत विद्या प्रकाश भट्टे यांच्याकडून प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान चालू आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. मात्र या मिळकतीबाबत खातरजमा करण्याकरीता ही नोटीस देण्यात येत आहे. तरी संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत करार भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार ठरवतील आणि पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**- संदर्भित जमीन मिळकतीचे परिशिष्ट-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड. | ३३२/ब/३ | ०-४३-०० पैकी उत्तरेकडील ००-२०-०० | ८.९४ |

अलिबाग,
दिनांक :
२६/०७/२०२४.

**राजेंद्र दा. पाटील**
ॲडव्होकेट
कृष्णवंदन- २ ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९८२२५२८९३१.

**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**रायगड यांचे कार्यालय**
**शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, कामत आळी,**
**सतक्रार प्रेस समोर, ता. अलिबाग, जि. रायगड**
**दुरध्वनी क्रमांक क्र. ०२१४१-२२२०१३**
ई-मेल.ddr. rgd@rediffmail.com

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत)

**जाहीर नोटीस**

अर्जदार यूनिक १ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे ता.अलिबाग जि.रायगड यांनी गैरअर्जदार से. यूनिक कन्स्ट्रक्शन तर्फे प्रोपा श्री अफजल हुसेन ए.जी. शेख जमिनमालक व विकासक शॉप नं.८, तळमजला, ६९ इब्राहिम रेहमतुल्ला रोड, मुंबई ४००००३ यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम १९(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**भूमापन क्रमांव व उपविभाग २६/१/८ क्षेत्र ८२५.०० चौ.मी.**

अर्जदाराचे अर्जाबाबत गैरअर्जदार यांना नोटीस बजावणी झाली नाही, त्यांचे पोस्टाचे पाकीट ॲड्रेस लेफ्ट विदाऊट इन्स्ट्रक्शन्स असा शेरा घेवून परत आले आहे. सबब अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व गैरअर्जदार यांना या नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, सदर मिळकतीचे अर्जदारास अभिहस्तांतरण करुन देणे संबंधीचे त्यांचे म्हणणे दिनांक १३/०८/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे, तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग — सही/-
दिनांक २५.०७.२०२४ — **(प्र.का.जगताप)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

प्रोसेस जमा — अर्जदार तर्फे वकिल सचिन नाईक.

**जाहिर नोटीस**

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

दिवाणी चौ. अर्ज. ११९/२०२४

श्री. सुशील चिंतामण राउत, वगैरे ३ — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी त्यांचे वडील कै. चिंतामण महादेव राउत यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळावा. म्हणून या मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना त्यांचे वडील कै. चिंतामण महादेव राउत यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यात कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन एक महिन्याचे आत किंवा दि. १६/८/२४ पर्यंत स्वतः किंवा त्यांच्या वकिलांमार्फत हजर राहुन आपली हरकत कळवावी वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वडील कै. चिंतामण महादेव राउत यांचे वारस म्हणुन वारस दाखला (Sucession Certificate) देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही. असे समजण्यात येवुन मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देणेचा हुकुम अर्जदार यांचे लाभात करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि.१८ माहे ७ सन २०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही — **लिपीक** — **दिवाणी न्यायाधिश व स्तर अलिबाग**
**कोर्टाचा शिक्का**
सही — **अधिक्षक** — **दिवाणी न्यायाधिश व स्तर अलिबाग**

## ग्रुप ग्रामपंचायत नागांव

मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड, पिन -४०२२०४

जावक क्र.- ९५८ — दिनांक- २४/०७/२०२४

**जाहिर निविदा**

ग्रुप ग्रामपंचायत नागांव, ता. अलिबाग, जि. रायगडकडून ग्रामनिधी अंतर्गत खालीलप्रमाणे साहित्य पुरविठेसाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

| अ. क्र | निधीचा स्त्रोत | अंदाजित रक्कम | कामाचे नाव | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामनिधी | ३,००,०००/- | ग्रा.प.साठी डिजिटल कर वसुली प्रणाली तयार करणे. | ६ महिने |

१) निविदे/दरपत्रके मोहोरबंद पाकीटात मा. सरपंच ग्रुप ग्रामपंचायत नागांव यांचे नावे दि.२७/०७/२०२४ ते ०२/०८/२०२४ रोजी पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून सकाळी १०.०० ते १.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.
२) कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा/ दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
३) कोणत्याही नामंजूर निविदा/दर पत्रके संदर्भात संबंधित ठेकेदारास कुठल्याही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
४) दिलेल्या मुदतीनंतर आलेली निविदा/ दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
५) यासाठी आलेल्या निविदा/दरपत्रके पैकी कोणत्याही निविदा/दरपत्रके किंवा सर्व निविदा/ दरपत्रके कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत आणि निविदा/ दरपत्रके पाठविण्याच्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा/दरपत्रके फेटाळण्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.
६) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा/दरपत्रके दि.०५/०८/२०२४ रोजी दुपारी ०३ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा.सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.

सही/-
**सौ. श्वेता संजय कदम**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**
**ता. अलिबाग, जि. रायगड**

सही/-
**सौ. हर्षदा निखील मयेकर**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**

## ग्रुप ग्रामपंचायत भाले, ता. माणगाव, जि. रायगड

**जाहीर निविदा** — नोटीस प्रसिद्धी २२/०७/२०२४

ग्रुप ग्रामपंचायत भाले, ता. माणगाव, जि.रायगड यांजकडून सन २०२४/२५ वर्षांकरिता १५ वा वित्त आयोग योजनांतर्गत खालील कामांच्या/साहित्य पुरवठ्याच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव/ साहित्याचे नाव | योजनेचे नाव | अंदाजित रक्कम | निविदा फार्म की | १% इसारा रक्कम | निविदा मिळणेची तारीख | निविदा उघडण्याची तारीख | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक स्वच्छतेकरिता उपाययोजना करणे निर्जंतुक पावडर, जलशुद्धीकरण क्लोरीवॅट, कीटक प्रतिबंधक औषधे व इंधन पुरविणे. | १५ वा वित्त आयोग | ६००९१/- | २००/- | ६०१/- | २४/०७/२०२४ | ३१/०७/२०२४ | ६ महिने |
| २ | बोंडशेत न.पा.पु. योजना क्र.१ मोबाईल द्वारे सुरु करणे. | १५ वा वित्त आयोग | १९६३०/- | २००/- | ११६/- | २४/०७/२०२४ | ३१/०७/२०२४ | ६ महिने |
| ३ | जावटे न.पा.पु. योजना मोबाईल द्वारे सुरु करणे. | १५ वा वित्त आयोग | १९६३०/- | २००/- | ११६/- | २४/०७/२०२४ | ३१/०७/२०२४ | ६ महिने |
| ४ | कांदळगाव खु.न.पा.पु.योजना मोबाईलद्वारे सुरू करणे | १५ वा वित्त आयोग | १९६३०/- | २००/- | ११६/- | २४/०७/२०२४ | ३१/०७/२०२४ | ६ महिने |
| ५ | चांदेवाडी न.पा.पु.योजना क्र.१ मोबाईलद्वारे सुरू | १५ वा वित्त आयोग | १९६३०/- | २००/- | ११६/- | २४/०७/२०२४ | ३१/०७/२०२४ | ६ महिने |
| ६ | बोंडशेत न.पा.पु.योजना क्र.२ मोबाईलद्वारे सुरू करणे. | १५ वा वित्त आयोग | ८६९७/- | २००/- | ८७/- | २४/०७/२०२४ | ३१/०७/२०२४ | ६ महिने |
| ७ | ग्रामपंचायत हद्दीत सौरपथ दिवे बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ६५०००/- | २००/- | ६५०/- | २४/०७/२०२४ | ३१/०७/२०२४ | ६ महिने |
| ८ | बोंडशेत अंगणवाडीकरीता डिजीटल वजन काटा पुरविणे. | १५ वा वित्त आयोग | ५०००/- | २००/- | ५०/- | २४/०७/२०२४ | ३१/०७/२०२४ | ६ महिने |
| ९ | प्राथमिक शाळा भाले डिजीटल प्रणाली पुरविणे | १५ वा वित्त आयोग | ४००००/- | २००/- | ४००/- | २४/०७/२०२४ | ३१/०७/२०२४ | ६ महिने |
| १० | ग्रामपंचायतीकरीता संगणक खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग | ६५०००/- | २००/- | ६५०/- | २४/०७/२०२४ | ३१/०७/२०२४ | ६ महिने |

**अटी व शर्ती :** १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. ३०/०७/२०२४ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती / चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/ पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/ पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता.माणगाव जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता.माणगाव जि.रायगड**

# खेळांच्या महाकुंभासाठी खेळाडू सज्ज

पॅरिस ऑलिम्पिक 2024

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

खेळांचा महाकुंभ म्हणून ओळखली जाणारी स्पर्धा म्हणजे ऑलिम्पिक. दर चार वर्षांनी होणारी ही स्पर्धा क्रीडा विश्वातील सर्वात मोठी स्पर्धा आहे. यामुळे या स्पर्धेत सहभागी होण्याचे स्वप्न प्रत्येत खेळाडू पाहतो. आता पॅरिसमध्ये यंदा ऑलिम्पिक स्पर्धा सुरू होत आहे. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेचा उद्घाटन सोहळा २६ जुलै रोजी पार पडणार आहे. पण त्याआधी २४ जुलैपासूनच वेगवेगळ्या खेळांच्या प्राथमिक फेऱ्यांना सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत भारताचे एकूण ११७ खेळाडू सहभागी होणार आहेत. एकूण १८ दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत भारताचे खेळाडू १६ क्रीडा प्रकारांमध्ये खेळताना दिसणार आहेत. सर्वाधिक २९ खेळाडू अॅथलेटिक्समध्ये सहभागी होणार आहेत, त्यापाठोपाठ २१ खेळाडू नेमबाजीमध्ये सहभागी होणार आहेत.

दरम्यान, या स्पर्धेत जुलै महिन्यातील भारतीयांचे सामने कधी आणि किती वाजता आहेत, त्या वेळापत्रकाचा अढावा घेतला आहे.



**भारताचे ऑलिम्पिकचे वेळापत्रक जुलै**

**२६ जुलै-** तिरंदाजी- महिला (दुपारी १ वा.) आणि पुरुष (संध्या. ५.४५ वा.), वैयक्तिक क्वालिफायर्स उद्घाटन सोहळा (रात्री ११.३० वा.)

**२७ जुलै-** नेमबाजी- १० मी. एअर रायफल (दुपारी २ वा.) (मेडलसाठीही लढत)

हॉकी- भारत विरुद्ध न्यूझीलंड (रात्री. ९ वा.)

बॅडमिंटन- सर्व प्रकारातील सामने (दुपारी १२.५० वा.)

बॉक्सिंग- प्रीती पवार (संध्या. ७ वा.)

रोईंग- पुरुष स्कल्स हिट (दुपारी १२.३० वा.

घोडेस्वारी- ड्रेसेज (दुपारी १ वा.)

टेबल टेनिस- एकेरी (संध्या. ६.३० वा.)

टेनिस - पुरुष एकेरी पहिली फेरी (दुपारी ३.३० वा.)

**२८ जुलै-**नेमबाजी- १० मी. एअर पिस्तूल पुरुष (दुपारी १ वा.) आणि महिला (दुपारी ३.३० वा.)

तिरंदाजी- महिला सांघिक (दुपारी १ वा.)

बॉक्सिंग- निखत झरिन (दुपारी ३.५० वा.) आणि निशांत देव (दुपारी २.४६ वा.)

बॅडमिंटन- सर्व प्रकारातील सामने (दुपारी १२ वा.)

रोईंग- पुरुष स्कल रेपेचेज (दुपारी १.०६ वा.)

टेबल टेनिस- एकेरी (दुपारी ३.३० वा.)

टेनिस- एकेरी आणि दुहेरी (दुपारी ३.३० वा.

जलतरण- पुरुष १०० मी. बॅकस्ट्रोक आणि महिला २०० मी. फ्रीस्टाईल (२९ जुलै - रात्री १.०७ वाजता)

**२९ जुलै-** नेमबाजी- पुरुष ट्रॅप क्वालिफायर्स (दुपारी १२.३० वा.)

सांघिक पिस्तूल क्वालिफायर्स (दुपारी १२.४५ वा.)

१० मीटर एअर रायफल महिला (दुपारी १ वा.) आणि पुरुष (दुपारी ३ वा. (मेडल्ससाठीही लढत)

तिरंदाजी- पुरुष सांघिक (दुपारी १ वा.)

हॉकी- भारत विरुद्ध अर्जेंटिना (दुपारी ४.१५ वा.)

बॅडमिंटन- सर्व प्रकारांच्या लढती (दुपारी १ वा.)

टेबल टेनिस- एकेरी (दुपारी ३.३० वा.) रोईंग- पुरुष स्कल्स (दुपारी १ वा.)

**३० जुलै -** नेमबाजी- १० मीटर एअर पिस्तूल मिश्र संघ (कांस्य पदकासाठी लढत (दुपारी १ वा.), सुवर्णपदकासाठी लढत १.३० वा.)

पुरुष ट्रॅप अंतिम फेरी (पदकासाठी लढती) (संध्या. ७ वा.)

महिला ट्रॅप क्वालिफायर्स हॉकी- भारत विरुद्ध आयर्लंड (दुपारी. ४.४५ वा)

बॅडमिंटन- सर्व प्रकारांच्या लढती (दुपारी १२ वा.)

बॉक्सिंग- प्रीती पवार (दुपारी ३.५० वा.) जास्मिन (दुपारी ४.३८ वा.)

तिरंदाजी- महिला आणि पुरुष (दुपारी ३.३० वा.)

रोईंग- पुरुष स्कल्स उपांत्यपूर्व फेरी (दुपारी १.४० वा.)

घोडेस्वारी- ड्रेसेज जीपी (दुपारी २.३० वा.) टेबल टेनिस- पुरुष आणि महिला (दुपारी १.३० वा.)

टेनिस- पुरुष आणि दुहेरी (दुपारी ३.३० वा).

**३१ जुलै-** नेमबाजी- ट्रॅप महिला अंतिम फेरी (पदकासाठी लढती) (संध्या. ७ वा) पुरुष ५० मीटर ३ पोझिशन्स क्वालिफायर्स बॅडमिंटन- सर्व प्रकारांच्या लढती (दुपारी १२ वा.)

बॉक्सिंग- लवलिना बोर्गोहेन (दुपारी ३.३४ वा.), निशांत देव (संध्या. ७.४८ वा.) टेबल टेनिस- महिला आणि पुरुष (दुपारी १.३० वा.) घोडेस्वारी- ड्रेसेज ग्रँड प्रिक्स (दुपारी १.३० वा.


टेनिस- एकेरी तिसरी फेरी आणि दुहेरी उपांत्य फेरी (दुपारी ३.३० वा.)

## 'आयफेल' टॉवरवरून...

### विनायक दळवी

## एका दिग्गजाला दुसऱ्याबद्दल काय वाटते !





**ऑलिम्पिक क्रीडासोहळा म्हणजे विश्वातील उत्तम खेळाडूंना एकाच व्यासपीठावर पाहण्याची उत्तम संधी. क्रीडाविश्वाच्या या कुंभमेळ्यामध्ये जगातले सर्वोत्तम खेळाडू एवढ्या सहजतेने तुमच्या अवतीभवती वावरत असतात की, कुणाकुणाला डोळे भरून पहावे असे होऊन जाते. मात्र, हीच भावना प्रकाश पदुकोणसारखा एखादा विश्वविख्यात बॅडमिंटनपटू स्वत: कसा करतो त्याचे आश्चर्य वाटते.**


प्रकाश पदुकोणचे हे पहिलेच ऑलिम्पिक. भारताची पी.व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन हे दोघेजण सध्या त्यांच्या अॅकडमीत मार्गदर्शन घेत आहेत. आणि जेव्हा प्रकाश पदुकोण यांना भारतीय संघाला ऑलिम्पिकसाठी मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली. त्यानिमित्ताने त्यांचे ऑलिम्पिक परिवारात सामील होण्याचे किंवा ऑलिम्पिक प्रवाहात येण्याचे स्वप्न साकार झाले.

प्रकाश पदुकोणला बॅडमिंटन क्षेत्रात खूप मान आहे. अशा खेळाडूला सध्याच्या खेळाडूंसमवेत वावरताना कृतकृत्य झाल्यासारखे वाटतेय. खाण्याच्या टेबलवर रफाल नदाल, कार्लोस अल्कारासला पाहून प्रकाश क्षणभर 'स्तब्ध'च झाला होता. जगातील अशा मोठमोठ्या खेळाडूंसोबत एकाच टेबलावर खाणे व खाण्याचा आनंद अवर्णनीयच. स्वतः खेळाडू असल्याने खेळाडूंना अशा प्रसंगी बोलण्याचा प्रयत्न करून विचलित करायचे नसते हे त्याला ठाऊक होते. एकमेकांकडे पाहत खाण्याचा आनंद त्यांनी लुटला एवढेच.

मात्र, प्रकाशची उपस्थिती भारतीय बॅडमिंटन संघासाठी खूपच प्रेरणादायी ठरणार आहे. भारताचे माजी ऑलिम्पियन प्रदीप गंधे यांना वाटते की, प्रकाशसारख्या खेळाडूंचे संघासोबत राहणे, पदकांची संख्या वाढण्यासाठी लाभदायक ठरू शकते.

भारतीय बॅडमिंटन संघाकडून भारताला यावेळी खूपच अपेक्षा आहेत. चिराग-सात्विक ही दुहेरीची जोडीसुद्धा जगात धुमाकूळ घालतेय. पॅरिसमध्ये आपण ऑलिम्पिक स्पर्धेत खेळतोय हे विसरून, दडपण न घेता ही जोडी खेळली तर पदक निश्चित आहे. कदाचित सुवर्णपदकही मिळू शकते. पी.व्ही. सिंधू अनुभवी आहे. ऑलिम्पिक पदके पटकाविण्याचा गेल्या दोन ऑलिम्पिकचा अनुभव तीच्या गाठीशी आहे. म्हणजे पदकांची चव तीने चाखली आहे. गेल्या वर्ष-दीड वर्षात ती पूर्ण फॉर्ममध्ये नसली तरीही ऑलिम्पिकसारखी मोठी स्पर्धा तिला पदक पटकाविण्यासाठी प्रवृत्त करू शकेल.

पी.व्ही. सिंधू, चिराग-सात्विक, लक्ष्य सेन, प्रणव हे भारताचे स्टार बॅडमिंटनपटू सध्या बॅडमिंटन स्पर्धेत खूप खेळले आहेत. त्यांनी अतिशय चुरशीच्या मॅचेस जिंकल्या आहेत. त्यामुळे स्वतःवर दडपण निर्माण न होऊ देता, नेहमीप्रमाणे नियमित स्पर्धा समजून हे खेळाडू खेळले तर भारताला बॅडमिंटनमध्ये चार पदके मिळविण्याची संधी आहे. लक्ष्य सेन प्रणव हे जसे डोक हॉर्स आहेत, तसेच सिंधू व चिराग-सात्विक जोडी निश्चितची पदक मिळवू शकेल इतपत विश्वास भारतीयांना देऊ शकतात. अतिशय चुरशीच्या सामन्यात, विशेषतः ११ गुणानंतरची विश्रांती असते, त्यावेळी प्रकाश पदुकोण यांच्या अनुभवाचे बोल यावेळी भारताला पदकांपर्यंत नेऊ शकतो. अशा परिस्थितीतून प्रकाश पदुकोण अनेकदा गेले आहेत. तो अनुभव यावेळी कामी येणार आहे.




## आयपीएल संघात होणार बदल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धा आता पुढील वर्षी होणार आहे. परंतु, त्याआधी प्रत्येक संघात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. कारण आयपीएल २०२५ स्पर्धेपूर्वी मेगा ऑक्शन होणार आहे. मात्र, अद्यापही हे मेगा ऑक्शन कसं होणार आणि काय नियम असणार हे निश्चित झालेलं नाही. त्यामुळे याबाबत लवकरच आयपीएल फ्रँचायझी आणि बीसीसीआय यांच्यात चर्चा होईल.

दरम्यान, आयपीएल फ्रँचायजींनी दर पाच वर्षांनी मेगा ऑक्शन, ४ किंवा ६ खेळाडूंचे रिटेंशन, राईट टू मॅच पर्याय असे अनेक पर्याय या मेगा





ऑक्शनआधी फ्रँचायझींनी बीसीसीआयला सुचवले असल्याचे समजत आहे. फ्रँचायझीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने म्हटले की, दर ५ वर्षांनी मेगा ऑक्शन घेण्याचे काही फायदे आहेत. ज्यामुळे संघांना युवा खेळाडूंना घडवण्यासाठी वेळ मिळेल, तसेच संघातही सातत्य राहिल. अनेक फ्रँचायझींनी खेळाडू घडवण्यासाठी ऍकेडमीही तयार केल्या आहेत. अशात ५ वर्षांचा वेळ मिळाला, तर खेळाडू घडवण्यासाठी मदत होईल.

## रहाणेची इंग्लंडमध्ये तुफान फटकेबाजी

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघात पुनरागमन करण्यासाठी प्रयत्नशील असलेला अजिंक्य रहाणे इंग्लंडमध्ये तुफान फटकेबाजी करताना दिसत आहे. त्याच्या झंझावाती खेळीच्या जोरावर संघाने एकदीवसीय चषक स्पर्धेतील 'ब' गटाच्या सामन्यात ३६९ धावा केल्या. या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानावर उतरलेल्या नॉटिंगहॅमशायरला ८९ धावांवर रोखले. रहाणेने लीसेस्टरशायरकडून पदार्पणाच्या सामन्यात ६० चेंडूंत ९ चौकारांसह ७१ धावांची शानदार खेळी केली.

अजिंक्य रहाणेच्या खेळीच्या जोरावर लीसेस्टरशायरने ५० षटकांत ६ बाद ३६९ धावा केल्या. सॉल बुडिंगरने ७५ आणि कर्णधार लुईस हिलने ८१ धावांची खेळी केली. लीसेस्टरशायरने नॉटिंगहॅमशायर या संघासमोर ३७० धावांचे लक्ष्य ठेवले होते, परंतु पावसाचा व्यत्यय आल्याने डकवर्थ लुईस नियमाच्या आधारे नॉटिंगहॅमशायरला १४ षटकांत १०५ धावांचे सुधारित लक्ष्य मिळाले. पण, नॉटिंगहॅमशायरला ६ बाद ८९ धावाच करता आल्या.



अजिंक्य रहाणे सुमारे वर्षभरापूर्वी भारतीय संघाच्या जर्सीत दिसला होता. गेल्या वर्षी जुलैमध्ये त्याने वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी सामना खेळला होता, त्यानंतर तो संघाबाहेर आहे. तो आयपीएल २०२४ मध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून खेळला होता, परंतु त्याला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. त्यानंतर तो इंग्लंडमध्ये लीसेस्टरशायरकडून खेळण्यासाठी गेला.

## 'नीरजमुळे आत्मविश्वास उंचवला'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्राचा अॅथलीट सर्वेश कुशारे यंदा पॅरिस ऑलिंपिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. सर्वेश पुरुष विभागातील उंच उडी प्रकारात सर्वस्व पणाला लावताना दिसेल. सर्वेश याने प्रतिष्ठेच्या क्रीडा महोत्सवाआधी आत्मविश्वास उंचावल्याचे मत व्यक्त केले. तो म्हणाला, प्रतिस्पर्ध्याची कीर्ती किती मोठी हे पाहून घाबरू नकोस. सरावावर अधिक लक्ष दे. असा सल्ला नीरज चोप्रा याने मला दिला. त्यामुळे माझा आत्मविश्वास कमालीचा उंचावला आहे.



पोलंड येथे ऑलिंपिकचा सराव करीत असताना सर्वेश कुशारे याने आपले मत व्यक्त केले. दरम्यान, पॅरिस ऑलिंपिकसाठी २.३३ मीटर उंच उडीची पात्रता होती. सर्वेश कुशारे पॅरिससाठी पात्र ठरेल याची शाश्वतीही नव्हती. जागतिक क्रमवारीतील कोट्यानुसार त्याला ऑलिंपिकसाठी पात्र ठरता आले.

## स्पेनची विजयी सुरुवात

**। पॅरीस । वृत्तसंस्था ।**

स्पेन आणि अर्जेंटिना यांनी पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत दुसऱ्या फळीतील खेळाडू उतरवले आहेत. स्पेनच्या संघाने 'क' गटात विजयी सुरूवात केली, तर अर्जेंटिनाला 'ब' गटात बरोबरीवर समाधान मानावे लागले.

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतील फुटबॉल सामन्यांना गुरूवार पासून सुरूवात झाली. 'ब' गटातील सामन्यात मोरोक्कोने वर्चस्व राखताना अर्जेंटिनाला जखडून ठेवले होते. मोरोक्कोविरुद्धचा हा सामना २-२ असा बरोबरीत सुटला.



'क' गटातील सामन्यात स्पेनने २-१ अशा फरकाने उझबेकिस्तानचा पराभव केला. मार्क पुबिलने २९व्या मिनिटाला स्पेनला पहिला गोल करून दिला. दुसऱ्या हाफमध्ये दोन्ही संघांनी आघाडीसाठी जोर लावला, परंतु ६२व्या मिनिटाला सर्गिओ गोमेझच्या गोलने स्पेनला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर स्पेनने ही आघाडी कायम राखताना विजय पक्का केला.

## श्रीलंकेच्या नुवान तुषाराची माघार

**। कोलंबो । वृत्तसंस्था ।**

दुश्मंथानंतर श्रीलंकेच्या आणखी एका गोलंदाजाला भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेतून माघार घ्यावी लागली आहे. जलदगती गोलंदाज नुवान तुषारा याचे सरावादरम्यान डाव्या हाताचे बोट मोडलं आणि त्यामुळे त्याला टी-२० मालिकेतून माघार घ्यावी लागली. श्रीलंका क्रिकेट बोर्डाने तुषाराच्या रिप्लेसमेंटची घोषणा केलेली नाही. टीम मॅनेजर महिंदा हलागोंडाने या वृत्ताला दुजोरा दिला आणि दुखापत न होणे हे गोलंदाजाच्या हातात नसते, असेही ते म्हणाले.

## केएल राहुलचे लवकरच पुनरागमन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा यष्टीरक्षक फलंदाज केएल राहुल लवकरच भारतीय संघात पुनरागमन करणार आहे. त्याची श्रीलंकेविरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. भारतीय संघाला २७ जुलैपासून श्रीलंका दौऱ्यात ३ सामन्यांची टी-२० आणि ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळायची आहे. मात्र, केएल



राहुलला टी-२० मालिकेसाठी संधी देण्यात आलेली नाही. मात्र, एकदिवसीय संघातील तो प्रमुख खेळाडूंपैकी एक आहे दरम्यान, २ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेपूर्वी त्याने नेटमध्ये जोरदार सराव केला आहे. त्याने नेटमध्ये फलंदाजीचा सराव करतानाचा एक १४ सेंकदाचा व्हिडिओ सोशल माडियावर शेअर केला आहे. त्यामुळे आता त्याच्याकडू चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे.

## नव्या जर्सीवर दोन स्टार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाच्या नव्या पर्वाला श्रीलंका दौऱ्यातून सुरूवात होणार आहे. संघाच्य टी-२० मालिकेतील जर्सीवर डाव्या बाजूला दोन स्टार दिसणार आहेत. भारताने रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली २०२४ चा तर २००७ मध्ये धोनीच्या नेतृत्त्वाखाली टी-२० विश्वचषक जिंकला होता. त्यामुळेच आता भारतीय संघाच्या जर्सीवर विश्वचषकांचे प्रतिक म्हणून दोन स्टार दिसणार आहेत.

## चव्हाण यांची कोऑर्डिनेटर पदावर नियुक्ती

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

जयपूर येथे होणाऱ्या 'इंटर्नल व्हाईस ऑफ डॉक्टर्स' स्पर्धा २०२४ साठी माणगाव येथील सुप्रसिद्ध सर्जन डॉ. सचिन जगन्नाथ चव्हाण यांची झोनल कोऑर्डिनेटर पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. चव्हाण यांची उपरोक्त स्पर्धे करीता नियुक्ती झाल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



जयपूर येथे होणारी हि स्पर्धा जागतिक पातळीवर होत असून या स्पर्धेत परदेशातूनही अनेक स्पर्धक सहभागी होत असतात. हि स्पर्धा फक्त डॉक्टरांसाठीच असते. या स्पर्धेकरिता माणगाव येथील सुप्रसिद्ध सर्जन डॉ. सचिन चव्हाण यांची साऊथ आणि महाराष्ट्राकरीता नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी जयपूर येथे पार पडलेल्या ऑल इंडिया म्युझिक स्पर्धेत डॉ. सचिन चव्हाण यांनी सहभाग घेऊन आपल्या समवेत सहा कलाकारांना घेऊन कव्वालिची वेशभूषा करून बहारदार कव्वालिचे सादरीकरण केले होते.

### महिला आशिया चषक २०२४ उपांत्य फेरीतील सामने

## भारतासह अंतिम चार संघांवर शिक्कामोर्तब

**। डंबुला । वृत्तसंस्था ।**

**महिला आशिया चषक स्पर्धेत बुधवारी (दि.२४) 'ब' गटातील साखळी फेरीचे अखेरचे सामने झाले. त्यामुळे आता उपांत्य फेरीत प्रवेश करणाऱ्या अंतिम ४ संघांवर शिक्कामोर्तब झाले आहे. उपांत्य फेरीत भारत, पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेश या महिला संघांनी स्थान पक्के केले आहे.**



'अ' गटातून भारत आणि पाकिस्तान संघांनी उपांत्य फेरीत स्थान मिळवले आहे. या गटात भारत तीन विजयांसह अव्वल क्रमांकावर राहिला, तर पाकिस्तान दोन विजय आणि एका पराभवासह दुसऱ्या क्रमांकावर राहिला. 'ब' गटातील अखेरच्या साखळी सामन्यांमध्ये बांगलादेशने मलेशियालाला ११४ धावांनी पराभूत केले, तर श्रीलंकेने १० गडी राखून थायलंडला पराभूत केलं. त्यामुळे 'ब' गटात श्रीलंकेने तीन विजयांसह अव्वल क्रमांक मिळवला आहे, तर बांगलादेशने दोन विजय आणि एका पराभवासह दुसरा क्रमांक मिळवला. त्यामुळे श्रीलंका आणि बांगलादेश हे दोन संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले. त्यामुळे आता उपांत्य फेरीत कोणाचे सामने कोणाविरुद्ध आणि कधी होणार हे समोर आले आहे.

'अ' गटात अव्वल क्रमांकावर राहिलेल्या भारतीय महिला संघाचा सामना 'ब' गटातील दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या बांगलादेश महिला संघाविरुद्ध होणार आहे. हा सामना डंबुला येथे शुक्रवारी (दि.२६) भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी २ वाजता सुरू होईल. तसेच, 'ब' गटात अव्वल क्रमांकावर राहिलेल्या श्रीलंकेचा सामना 'अ' गटात दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या पाकिस्तानविरुद्ध शुक्रवारीच डंबुला येथे संध्याकाळी ७ वाजता सुरू होणार आहे. या उपांत्य फेरीच्या सामन्यांत विजय मिळवणारे संघ रविवारी (दि.२८) अंतिम सामन्यात आमने-सामने येतील.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)